राष्ट्रीय मासिक

# विश्वात्मक लोकस्वामी वार्ता

RNI No.MAHBIL/2019/79644

POSTAL REGD.NO. MCW 348/2024-26

Published on 10th of Every Month

Posted at Dharavi Post Office,Mumbai-400 017 on 15th of Every Month.

•www.vishwatmaklokswamivarta.com •वर्ष : ७ वे •अंक : १२ • मुंबई, ऑक्टोबर २०२६ •पृष्ठ : १२ •मूल्य :₹३/- • संपादक : चंद्रशेखर लिंगय्या स्वामी




## नवरात्रोत्सवानिमित्त हिंदु युवतींसाठी 'मैं हूँ दुर्गा' अभियान

### • हिंदु युवतींसाठी देशभरात अनेक ठिकाणी स्वसंरक्षण प्रशिक्षणवर्गांचे आयोजन !•

**मुंबई :** नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर हिंदु जनजागृती समितीच्या वतीने देशभरात 'मैं हूँ दुर्गा' अभियानाचे विशेष आयोजन करण्यात आले आहे. या अभियानांतर्गत अनेक शहरांमध्ये हिंदु युवती आणि महिलांसाठी विनामूल्य स्वसंरक्षण प्रशिक्षणवर्ग आयोजित करण्यात येत असून महिला सुरक्षेविषयी जनजागृती करणारे विविध व्हिडिओ, तसेच प्रेरणादायी शौर्य गीत प्रसारित करण्यात येणार आहेत, अशी माहिती हिंदु जनजागृती समितीचे राष्ट्रीय प्रवक्ते रमेश शिंदे यांनी दिली आहे.




याबाबत अधिक माहिती देतांना रमेश शिंदे पुढे म्हणाले की, आज युवतींना छेडछाड, पाठलाग, ऑनलाईन त्रास, लैंगिक छळ, ब्लॅकमेलिंग, तसेच हिंसक हल्ले यांसारख्या विविध धोक्यांना सामोरे जावे लागत आहे. तसेच काही परधर्मीय लोक खोटे नाव आणि खोटी ओळख सांगून हिंदू मुलींना प्रेमाच्या जाळ्यात ओढून 'लव्ह जिहाद'च्या माध्यमातून त्यांचे शारिरीक शोषण करतात. पुढे या लव्ह जिहादच्या घटनांमध्ये ब्लॅकमेलिंग किंवा धर्मांतरासाठी दबाव आणला जातो. याबाबत युवतींमध्ये जागरूकता निर्माण होणे अत्यंत आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर भीती नव्हे, तर जागरूकता, आत्मविश्वास आणि स्वरक्षणाचे कौशल्य निर्माण करण्यासाठी 'मैं हूँ दुर्गा' अभियान राबवण्यात येणार आहे.

या स्वसंरक्षण प्रशिक्षणवर्गामध्ये शारीरिक प्रतिकाराचे तंत्र शिकवण्याबरोबरच संकटाची चाहूल ओळखणे, योग्य वेळी निर्णय घेणे, तसेच मानसिक आणि आध्यात्मिक दृष्ट्या खंबीर रहाण्यासाठी मार्गदर्शन केले जाणार आहे. पान ४ वर

## 'धारावी हे मोठे आर्थिक इंजिन' 'एक्सपिरियन्स सेंटर' चे उद्घाटन



**मुंबई (धारावी) :** अत्याधुनिक 'धारावी एक्सपिरियन्स सेंटर' चे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन झाले. या सेंटरमुळे नागरिकांना पुनर्निर्माण प्रकल्पाचे आराखडे, त्यांच्या भविष्यातील घर, परिसर आणि कामाच्या ठिकाणाचा प्रत्यक्ष अनुभव घेता येईल.धारावी ही केवळ झोपडपट्टी नाही; ती एक मोठे आर्थिक इंजिन आहे. येथे कुंभारवाड्यातील मातीभांडी उद्योग, चामड्याचा व्यवसाय, अन्नप्रक्रिया, प्लास्टिक पुनर्चक्रीकरण तसेच अन्य लघु-मध्यम उद्योगांमधून मोठी अर्थव्यवस्था उभी राहिली आहे. या उद्योगांचा सन्मान राखत त्यांना अधिक चांगली आणि नियोजित कार्यस्थळे उपलब्ध करून देण्याचा विचार पुनर्विकास आराखड्यात करण्यात आला आहे. पान ५ वर

## मुंबईत २०२९ पर्यंत दहा टक्के पाणीकपात

**मुंबई :** गारगाई पाणीपुरवठा प्रकल्प व समुद्राचे खारे पाणी गोडे करण्याचा प्रकल्प पूर्ण होईपर्यंत म्हणजेच २०२९ पर्यंत मुंबईत १० टक्के पाणी कपात कायम राहणार आहे. परिणामी मुंबईकरांना ४,१०० दशलक्ष लिटर ऐवजी दररोज ३,६९० दशलक्ष लिटर इतकाच पाणीपुरवठा होणार आहे. त्यामुळे येणारी तीन वर्ष मुंबईकरांना पाणी टंचाईचा सामना करावा लागणार आहे.




मुंबई शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या तलावाच्या पाणलोट क्षेत्रात १४ लाख ४७ हजार दशलक्ष लिटर पाणी साठवण्याची क्षमता आहे. सप्टेंबर अखेरपर्यंत हा पाणीसाठा जैसे थे राहिला तरी, मुंबईकरांना कोणतीही पाणी कपात न करता आठ महिनेच पाणीपुरवठा करणे शक्य आहे. पान ५ वर

## अभिजित दिपके च्या डोक्यात हवा; बेताल वक्तव्य थांबवली नाही तर दिपके विरुद्ध आर.पी.आय कडक पाऊल उचलेल

**मुंबई :** अभिजित दिपके यांनी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांबद्दल चुकीचे वक्तव्य केले आहे.पंडित नेहरूंनी डॉ आंबेडकरांना पुढे आणले असे विधान अभिजित दिपके यांनी केले असून त्यांच्या या विधानाचा आम्ही तीव्र निषेध करतो. महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाद्वारे संपूर्ण देशाला पुढे आणले आहे. इतिहास विसरून चुकीचे वक्तव्य करणाऱ्या अभिजित दिपके यांच्या डोक्यात हवा शिरली आहे.ते प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबद्दल अत्यंत चुकीचे अनादर करणारे वक्तव्य करीत आहेत.त्यांनी बेताल वक्तव्य बंद करावीत नाहीतर पान ५ वर



- केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांचा इशारा

# धारावीतील सोशल नगर येथील मोकळ्या जागेवर कब्जा

## ▪दमदाटी दादागिरी करुन दोन दुकाने बांधली ▪ स्थानिक समाजसेविकेचा विरोध ▪

### ▪ मुख्यमंत्री, पालिका आयुक्तांकडे या अनधिकृत बांधकामावर करवाई करुन तोडण्याची मागणी ▪

**मुंबई (प्रतिनिधी)** धारावीतील एम. जी. रोडवरील सोशल नगर भागात असलेल्या एका मोकळ्या जागेवर बळकावून तिथे बेकायदेशीरपणे दुकानांचे बांधकाम केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी सितारा बेगम जाकीर सय्यद यांनी स्थानिक पोलीस आणि प्रशासनाला लेखी अर्ज देऊन संबंधितांवर कडक कायदेशीर कारवाई करण्याची आणि स्वतःच्या कुटुंबाला संरक्षण देण्याची मागणी केली आहे.

**नेमकी घटना काय ?**

अर्जदार सितारा बेगम सय्यद यांच्या घरासमोर मोकळी जागा होती. दिनांक २३ सप्टेंबर २०२६ रोजी ठेकेदार आणि कॉन्ट्रक्टर माफिया आणि गुंड टोळी तसेच कब्जा करणारी महिला सुनिता डुकरे, आकाश सिक्युरिटी गार्ड यांच्या संगनमत करून या मोकळ्या जागेवर दुकानांचे अनधिकृत बांधकाम केले आणि दोन्ही गाळ्यांना शटर लावून ताब्यात घेतले आहे.

**पोलिसांसमोरच दमदाटी आणि मुजोरी**

पीडितेने आरोप केला आहे की, या बेकायदेशीर बांधकामाविरोधात जेव्हा त्यांनी विरोध केला आणि १०० क्रमांकावर फोन करून पोलिसांची मदत मागितली, तेव्हा भूमाफियांच्या संरक्षणासाठी ५ ते ५० जणांचे असामाजिक तत्वे जमा झाले. हे लोक पीडित कुटुंबावर









स्थानिक समाजसेविका - सितारा बेगम सय्यद

धाकडपशाही करत दम देत धमकी दिली आहे. स्थानिक प्रशासनाकडे वारंवार अर्ज करूनही पालिका (BMC) आणि पोलीस यंत्रणा केवळ टोलवाटोलवीचा खेळ खेळत असल्याचा संताप नागरिकांकडून व्यक्त होत आहे. पान ५ वर

## सं पा द की य

# राज्यातून मान्सूनची माघार; शेतकऱ्यांसमोरील आव्हाने कायम!

महाराष्ट्राच्या शेती, अर्थव्यवस्था आणि जनजीवनाचा मान्सून हा अविभाज्य भाग आहे. जून महिन्यात पावसाचे आगमन झाल्यापासून ते पावसाळ्याच्या अखेरपर्यंत संपूर्ण राज्याचे लक्ष आकाशाकडे लागलेले असते. पावसाचे प्रमाण, त्याचे वितरण, पावसातील खंड आणि अतिवृष्टी या सर्व बाबींवर शेतीचे गणित अवलंबून असते. आता राज्यातून मान्सूनची माघार होण्याचा काळ सुरू झाला असताना, यंदाच्या पावसाळ्याचा आढावा घेणे आणि पुढील काळातील आव्हानांचा विचार करणे आवश्यक आहे. मान्सूनची माघार म्हणजे केवळ पावसाळ्याची समाप्ती नव्हे, तर शेतीच्या उत्पादनाचा, पाणी व्यवस्थापनाचा आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कस पाहणारा महत्त्वाचा टप्पा आहे.महाराष्ट्रात कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्र या भागांची भौगोलिक परिस्थिती वेगवेगळी आहे. त्यामुळे प्रत्येक भागातील पावसाची गरज आणि त्याचा शेतीवर होणारा परिणामही वेगळा असतो. कोकणात भरपूर पाऊस पडत असला, तरी काही भागांत अतिवृष्टीमुळे पूरस्थिती निर्माण होते. दुसरीकडे मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील काही भागांना पावसाच्या अनियमिततेचा सामना करावा लागतो. विदर्भात कधी मुसळधार पाऊस तर कधी दीर्घ पावसाचा खंड अशी परिस्थिती उद्भवू शकते.यातून एक गोष्ट स्पष्ट होते की, केवळ राज्यातील एकूण पावसाची आकडेवारी पाहून शेतीची स्थिती समजत नाही. पाऊस किती पडला, तो कोणत्या कालावधीत पडला, पिकांच्या वाढीच्या कोणत्या टप्प्यावर पडला आणि त्याचा जमिनीतील ओलाव्यावर किती परिणाम झाला, हे पाहणे अधिक महत्त्वाचे आहे. काही भागांत सरासरीइतका किंवा त्यापेक्षा अधिक पाऊस झाला, तरी त्याचे वितरण असमान असल्यास शेतकऱ्यांचे नुकसान होऊ शकते.खरीप हंगाम हा महाराष्ट्रातील लाखो शेतकऱ्यांच्या आर्थिक नियोजनाचा आधार आहे. कापूस, सोयाबीन, भात, मका, तूर, मूग, उडीद आणि इतर पिकांच्या उत्पादनावर शेतकरी कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न अवलंबून असते. पेरणीच्या काळात पुरेसा पाऊस झाला, तरी पीक वाढीच्या महत्त्वाच्या टप्प्यावर पावसाने दडी मारली तर उत्पादन घटण्याची शक्यता असते. त्याउलट काढणीच्या वेळी अतिवृष्टी झाल्यास पिकांचे नुकसान होते, धान्याची गुणवत्ता खालावते आणि बाजारभावावरही परिणाम होतो.मान्सूनची माघार जवळ येत असताना शेतकऱ्यांसमोर अनेक प्रश्न उभे राहतात. जमिनीत पुरेसा ओलावा आहे का? पिकांना आणखी पाण्याची आवश्यकता आहे का? रब्बी हंगामासाठी पाणीसाठा उपलब्ध राहील का? पिकांच्या काढणीसाठी हवामान अनुकूल राहील का? या प्रश्नांची उत्तरे प्रत्येक भागातील स्थानिक परिस्थितीनुसार बदलतात. विशेषतः पावसावर अवलंबून असलेल्या कोरडवाहू शेतीमध्ये मान्सूनच्या शेवटच्या टप्प्यातील पावसाला मोठे महत्त्व असते. पावसाचा खंड पडल्यास पिकांची वाढ खुंटू शकते, तर काढणीपूर्वी पाऊस झाल्यास शेतमालाचे नुकसान होऊ शकते. त्यामुळे या काळात कृषी विभागाने शेतकऱ्यांना वेळेवर आणि स्थानिक परिस्थितीला अनुरूप मार्गदर्शन करणे गरजेचे आहे.

# दुष्काळावर मात : हवी सर्वांची साथ

**महाराष्ट्रात पावसाचा खंड आणि पिकांचे नुकसान पाहून राज्य शासनाने २६५ तालुक्यांमध्ये ट्रिगर झ्र १ नुसार दुष्काळसदृष्य परिस्थिती जाहिर करुन त्या भागातील दुष्काळावर मात करण्यासाठी १२ उपाययोजनांची अंमलबजावणी सुरु केली आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील दुष्काळाच्या छायेत असलेल्या शेतकरी : नागरिकांना सहाय्य करुन दुष्काळावर मात करायची आहे यासाठी सर्वांची भक्कम साथ अत्यंत महत्त्वाची आहे.**



महाराष्ट्रातील शेती आणि शेतकरी हा प्रामुख्याने निसर्गाच्या कृपेवर आधारीत पावसावर अवलंबून आहे. आपल्या राज्यातील शेतीमध्ये कोरडवाहू शेती अधिक प्रमाणात केली जात असल्याचे आपल्या लक्षात येते. शेती ही पुर्णपणे पावसावर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांना कधी कधी निसर्ग ही कृपादृष्टी करीत नाही व नैसर्गिक संकट निर्माण होते आणि आपला बळीराजा दुष्काळासारख्या संकटात आणि चक्रव्यूहात अडकला जातो. अशीच काही बिकट परिस्थिती यंद्याच्या खरीप हंगामा पासून आपल्या समोर येऊन ठेपली आहे.

पावसाचे प्रमाण, पावसातील तूट आणि पाऊस पडण्यातील मोठा खंड यावर आधारित ट्रिगर : १ म्हणजे प्रथम कळ लागू करण्यात आली आहे. दुष्काळ जाहिर करण्याच्या प्रक्रियेतील ही पहिली पायरी आहे.

**शेतकऱ्यांना कोणत्या सवलती ?**

ट्रिगर-१ लागू झाल्यानंतर दुष्काळग्रस्त भागातील नागरिक आणि शेतकऱ्यांना विविध सवलती व उपाययोजना लागू करता येतात. मात्र, या सवलती आपोआप सर्वांना मिळतात असे नाही. संबंधित विभागांकडून शासन निर्णयानुसार त्यांची अंमलबजावणी केली जाते. त्यानुसार दुष्काळ सदृष्य पारिस्थिती जाहिर झालेल्या भागात खालीलप्रमाणे १२ उपाययोजना राबविण्यास प्राधान्य देण्यात आले आहे.

**(१) जमीन महसुलात सवलत :** दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना जमीन महसुलात सवलत देण्याची तरतूद आहे. (२) पीक कर्जाचे पुनर्गठन : शेतकऱ्यांच्या पीक कजार्चे पुनर्गठन करण्याची प्रक्रिया केली जाऊ शकते. (३) कर्जवसुलीस स्थगिती : शेती कर्जाच्या वसुलीला ठरावीक कालावधीसाठी स्थगिती देता येते. (४) वीजबिलात सवलत : दुष्काळग्रस्त भागातील कृषीपंपांच्या वीजबिलाबाबत सवलतीच्या उपाययोजना करता येतात. (५) परीक्षा शुल्कमाफी : दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कातून सवलत किंवा माफी देण्याची तरतूद आहे. (६) टँकरने पाणीपुरवठा : पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाल्यास टँकरद्वारे पाणीपुरवठा करता येतो. (७) चारा उपलब्धता : पशुधनासाठी चारा उपलब्ध करून देण्यासाठी चारा छावण्या किंवा अन्य उपाययोजना करता येतात. (८) रोजगाराच्या कामांना चालना : दुष्काळग्रस्त भागात रोजगार हमी योजनेअंतर्गत गरजेनुसार कामे सुरू करता येतात. (९) पिण्याच्या पाण्याला प्राधान्य : उपलब्ध पाणीसाठ्यातून पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देण्याची व्यवस्था केली जाते. (१०) पाणीपुरवठा योजनांची दुरुस्ती : पाणीपुरवठा योजनांच्या तातडीच्या दुरुस्तीला प्राधान्य दिले जाऊ शकते. (११) वीजपुरवठा खंडित न करण्याच्या उपाययोजना : दुष्काळग्रस्त भागातील पाणीपुरवठा योजनांचा वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी विशेष उपाय करता येतात. (१२) पीक नुकसानीसाठी स्वतंत्र मदत : पीक नुकसानभरपाई ही ट्रिगर-१ लागू झाल्याने थेट मिळत नाही. त्यासाठी पीक नुकसानीचे पंचनामे आणि शासनाने निश्चित केलेले मदतीचे स्वतंत्र निकष लागू राहतात. नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या पीक नुकसानीसाठी मदत देण्याची स्वतंत्र प्रक्रिया मदत व पुनर्वसन विभागाने नमूद केली आहे.

राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी मोठा निर्णय घेत दुष्काळ जाहीर केला आहे. राज्यातील २६५ तालुक्यात दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. राज्यातील ३५८ पैकी २६५ तालुक्यात दुष्काळ, याचा अर्थ ७५ टक्के महाराष्ट्रात दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. या निर्णयामुळे दुष्काळाची दाहकता अनुभवत असलेल्या शेतकरी आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रातील ७५ टक्के भागात दुष्काळ जाहीर झाल्याने आता दुष्काळाच्या विविध उपाययोजना जाहीर होऊन त्यांची अंमलबजावणी केली जात आहे. त्यावर पंचनाम्याची कार्यवाही तात्काळ पूर्ण करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.

**ट्रिगर : १ म्हणजे काय ?**

महाराष्ट्रातील संभाव्य दुष्काळी परिस्थितीचे मूल्यांकन करण्यासाठी ट्रिगर-१ हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. एखाद्या भागात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे का, हे तपासण्यासाठी शास्त्रीय निकषांवर आधारित तीन टप्प्यांच्या मूल्यमापनातील हा पहिला टप्पा आहे. महाराष्ट्र शासनाच्या जून २०१८ मधील सुधारित शासननिर्णयानुसार, मान्सून कालावधीत ७५ टक्क्यांपेक्षा कमी पाऊस झालेल्या किंवा पावसाचा प्रदीर्घ खंड पडलेल्या भागात दुष्काळ व्यवस्थापनातील पहिली धोक्याची सूचना म्हणून ट्रिगर-१ लागू केला जातो. ट्रिगर-१ लागू झाला म्हणजे थेट पूर्ण दुष्काळ घोषित होत नाही. यानंतर प्रशासकीय पातळीवर दुष्काळ निवारणाची प्रक्रिया सुरू होते.

ट्रिगर-१ च्या अहवालानंतर राज्य शासन प्रभावित तालुक्यांमध्ये पिण्याचे पाणी, चारा छावण्या, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची (मनरेगा) कामे आणि शेतकऱ्यांना तातडीची आर्थिक मदत देण्याचा मार्ग मोकळा करते. शासकीय नियमांनुसार, ट्रिगर-१ ची अंमलबजावणी झाल्यानंतर पुढील टप्प्यात उपग्रह निर्देशांक, जमिनीतील ओलावा आणि भूजल पातळी यांसारख्या घटकांचे मूल्यांकन करून ट्रिगर-२ चा आढावा घेतला जातो. त्यानंतर निवडक गावांमध्ये प्रत्यक्ष पीक पंचनामे करून शासनाने ठरवून दिलेल्या टक्केवारीपेक्षा जास्त नुकसान आढळल्यास ती गावे अधिकृतपणे दुष्काळ घोषित करण्यास पात्र ठरतात.

राज्यातील अनेक भागांत पावसाने मोठा खंड दिल्याने अनेक भागांमध्ये पिकांवर परिणाम झाला आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाकडून दुष्काळसदृश परिस्थितीचा प्राथमिक आढावा घेतला जात आहे. पाहणी दौरा केला जात आहे. दुष्काळ निवारण मंत्रिमंडळ उपसमिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आली आहे. जिल्हाधिकाऱ्यांकडून पंचनाम्याचे आदेश देण्यात आले असून त्रिस्तरीय समिती पंचनामे करणार आहे. या समितीमध्ये तलाठी,कृषी सहायक व ग्रामसेवक यांचा समावेश असून ते गाव पातळीवर पंचनामे करणार असल्याची माहिती आहे.

**२६५ तालुके दुष्काळाच्या छायेत**

पश्चिम विदर्भ म्हणजे अमरावती विभागात ५ जिल्हे येतात. त्यानूसार सर्व ५६ तालुके दुष्काळाच्या छायेत आले आहेत त्यामध्ये बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव जामोद, संग्रामपूर, चिखली, देऊळगावराजा, मेहकर, बुलडाणा, सिंदखेडराजा, लोणार, खामगाव, शेगाव, मलकापूर, मोताळा व नांदुरा; अमरावती जिल्ह्यातील अमरावती, भातुकली, चांदूर रेल्वे, नांदगाव खं., धामणगाव रेल्वे, अचलपूर, अंजनगावसुर्जी, तिवसा, धारणी, चिखलदरा, वरूड, मोर्शी, चांदूरबाजार व दर्यापूर; अकोला जिल्ह्यातील अकोट, अकोला, पातूर, तेल्हारा, मुतीर्जापूर, बाळापूर व बाशीर्टाकळी; वाशिम जिल्ह्यातील वाशिम, रिसोड, मालेगाव, मंगळूरपीर, कारंजा व मानोरा; तसेच यवतमाळ जिल्ह्यातील यवतमाळ, बाभुळगाव, कळंब, दारव्हा, दिग्रस, आर्णी, नेर, पुसद, उमरखेड, महागाव, वणी, मारेगाव, झरी-जामणी, केळापूर, घाटंजी व राळेगाव या तालुक्यांचा समावेश आहे. या सर्व ५६ तालुक्यांना प्रथम कळ (ट्रिगर -१) लागू करण्यात आला आहे. यांप्रमाणे राज्यातील २६५ तालुके समाविष्ट आहेत.

## थोडक्यात

### सारथी संस्थेला १२२ कोटी मंजूर

**मुंबई :** मराठा समाजातील विद्यार्थ्यांच्या वसतिगृहांच्या बांधकामासाठी छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण आणि मानव विकास संस्था अर्थात 'सारथी'ला १२२ कोटी ३४ लाख तर अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाला १५० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्याची माहिती मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिली. सारथी संस्थेच्या माध्यमातून मराठा समाजातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक आणि सामाजिक सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. मराठा समाजातील ५०० विद्यार्थी आणि ५०० विद्यार्थिनी या क्षमतेच्या आठ वसतिगृहांच्या उभारणीचे काम पूर्णत्वास जात आहे. पुढील शैक्षणिक वर्षापासून ही वसतिगृह विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध होतील अशा दृष्टीने नियोजन करण्यात येत असल्याचे विखे-पाटील यांनी सांगितले.

### मुंबईत जीआय मॅपिंग करून कचरापेट्या



**मुंबई :** स्वच्छ-सुंदर मुंबईसाठी पालिकेने जीआय पद्धतीने मॅपिंग करून कचरापेट्या बसवण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये सर्व वॉर्डमधील गर्दीच्या ठिकाणांचा अभ्यास करून ३० ते १०० मीटर अंतरावर कचऱ्याचे नवीन डबे बसवण्यात येणार आहेत. पालिकेच्या नियोजनानुसार ४० लिटर क्षमतेच्या कचरापेट्या गर्दीच्या ठिकाणी फुटपाथवर बसविण्यात येतील. उघड्यावर टाकल्या जाणाऱ्या कचऱ्यामुळे दुर्गंधी आणि आजारांची समस्या निर्माण होत असल्यामुळे कचरापेट्यांची संख्या वाढविण्यापेक्षा जिथे गरज आहे तिथेच योग्य अंतरावर कचरापेट्या बसविणे हा महापालिकेचा उद्देश आहे. जीआय पद्धतीच्या अभ्यासातून गर्दीची ठिकाणे, पादचारी वर्दळ, विद्यमान कचरा संकलन व्यवस्था आणि परिसराची भौगोलिक परिस्थिती यांचा विचार करून कचरापेटयांची ठिकाणे निश्चित करण्यात येणार आहेत.

### पंढरपूर वारीचा जागतिक स्तरावर डंका, माहितीपटाला आंतरराष्ट्रीय पुरस्कार




**मुंबई :** महाराष्ट्राच्या संतपरंपरेचा, वारकरी संप्रदायाचा आणि पंढरपूरच्या आषाढी वारीचा आध्यात्मिक व सांस्कृतिक वारसा आता जागतिक स्तरावर गौरवला गेला आहे. माहिती व जनसंपर्क विभाग आणि वॉर्नर ब्रदर्स डिस्कव्हरी यांच्या संयुक्त निर्मितीतील 'पंढरपूर वारी-इन द फूटस्टेप्स ऑफ द सेंट्स' या माहितीपटाची प्रतिष्ठित 'एशियन अकॅडमी क्रिएटिव्ह अवॉर्ड्स २०२६'मध्ये 'सर्वोत्कृष्ट ब्रँडेड कार्यक्रम' या श्रेणीत भारताचा राष्ट्रीय विजेता म्हणून निवड झाली आहे. इंग्रजी भाषेतील २२ मिनिटांच्या या माहितीपटातून वारकरी संप्रदायाचे वैशिष्ट्ये, संतपरंपरेचे योगदान आणि वारीमागील आध्यात्मिक विचार प्रभावीपणे मांडण्यात आले आहेत. संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम महाराज यांनी दिलेला भक्ती, समता, मानवता आणि बंधुभावाचा संदेश भाषेच्या सीमा ओलांडून आंतरराष्ट्रीय प्रेक्षकांपर्यंत पोहोचविण्यात हा माहितीपट महत्त्वपूर्ण ठरला आहे.

# एसटीचा 'आवडेल तेथे कोठेही प्रवास पास' आता ऑनलाईन




**मुंबई :** 'प्रवाशांच्या सोयीसाठी सुरू केलेल्या'आवडेल तेथे कोठेही प्रवास पास' योजनेंतर्गत पास पासेस काढण्यासाठी ४ व ७ दिवसांचे प्रवास पास आता ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध करून देण्यात आले आहेत. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरून प्रवाशांना हे पास काढता येणार आहेत. त्यामुळे आगारातून हस्तलिखित पद्धतीने पास देण्याच्या प्रक्रियेला आता घरबसल्या ऑनलाईन पास मिळवता येणार आहे.

एसटीच्या वाहतूक विभागाने २९ सप्टेंबर रोजी जारी केलेल्या परिपत्रकानुसार या योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या ४ व ७ दिवसांच्या पाससाठी ऑनलाईन कार्यप्रणाली सुरू केली आहे. महामंडळाच्या अधिकृत संकेतस्थळ तसेच मोबाईल ॲप्लिकेशनमध्ये ही सुविधा उपलब्ध आहे.

शासनाच्या आदेशानुसार एसटी महामंडळाने https://npublic.msrtcors.com या अधिकृत संकेतस्थळावर 'आवडेल तेथे कोठेही प्रवास पास' योजनेचे पास ऑनलाईन उपलब्ध करून दिले आहेत. प्रवाशांनी आवश्यक माहिती भरून ऑनलाईन पास काढता येणार आहे.

ऑनलाईन पद्धतीने काढलेला पास प्रिंट स्वरूपात किंवा प्रवाशाच्या मोबाईलमध्ये पीडीएफ स्वरूपात असला तरी वैध मानण्यात येणार आहे. प्रवासादरम्यान पासवरील क्यूआर कोड वाहक ईटीआयएम मशीनद्वारे स्कॅन करणार आहे. क्यूआर कोड स्कॅन केल्यानंतर प्रवाशाच्या पासची माहिती ईटीआयएम मशीनवर दिसणार असून, त्यानंतर प्रवाशाचे वैध ओळखपत्र तपासून पात्र प्रवाशाला प्रवासाची परवानगी दिली जाणार आहे.

क्यूआर कोड स्कॅन न झाल्यास प्रवाशांनी टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधून पासची पडताळणी करून घ्यावी, अशा सूचना एसटी प्रशासनाने दिल्या आहेत. या ऑनलाईन सुविधेमुळे प्रवाशांना पास काढणे अधिक सुलभ व पारदर्शक होणार आहे. आवडेल तेथे कोठेही प्रवास पास योजनेचे डिजिटल रूपांतर करत एसटी महामंडळाने प्रवाशांच्या हातातच पासची सुविधा उपलब्ध करून दिल्याने एसटी प्रवास अधिक सुलभ, आधुनिक आणि पारदर्शक होण्यास मदत होणार आहे.

**आगारातील होणार गर्दी कमी**

ऑनलाईन पास सुविधेमुळे प्रवाशांना आगारात रांगेत उभे राहण्याची गरज कमी होणार आहे. विशेषता सुट्टीच्या काळात आणि पर्यटनाच्या हंगामात पास काढणे अधिक सोपे होणार आहे. या सुविधेची माहिती सर्व विभागीय कार्यालये, आगार तसेच स्थानिक पातळीवर प्रवाशांपर्यंत पोहोचविण्याचे निर्देश महामंडळाने दिले आहेत.

## प्रतीक्षा नगरचा समूह पुनर्विकास म्हाडाच करणार



**मुंबई :** शीव येथील प्रतीक्षा नगर म्हाडा वसाहतीचा समूह पुनर्विकास स्वतःच करण्याचा निर्णय म्हाडाने घेतला आहे. ईपीसी कंत्राटदाराची नेमणूक करून म्हाडा हा पुनर्विकास करण्याच्या तयारीत आहे. याबाबतचा प्रस्ताव लवकरच गृहनिर्माण विभागाला मंजुरीसाठी पाठवण्यात येणार आहे.म्हाडा वसाहतींचा समूह पुनर्विकास करण्याचा निर्णय म्हाडाच्या मुंबई मंडळाने घेतला आहे. अभ्युदय नगर, मोतीलाल नगर, कामाठीपुराच्या धर्तीवर आता प्रतीक्षा नगर वसाहतीचा समूह पुनर्विकास करण्याची योजना म्हाडाने आखली आहे. सुमारे २५ हेक्टर जागेवर वसलेल्या प्रतीक्षा नगर येथील म्हाडा वसाहतीत सद्यस्थितीत २१६ इमारती असून त्यामध्ये जवळपास १० हजार घरे आहेत. त्यापैकी ९० म्हाडाची संक्रमण शिबिरे आहेत. प्रतीक्षा नगरचा समूह पुनर्विकास 'बांधकाम आणि विकास संस्था' (सी अँड डी) नेमून करायचा की कंत्राटदार नेमून करायचा, याबाबत म्हाडाची चाचपणी सुरू होती. अखेर कंत्राटदाराची नेमणूक करून स्वतःच पुनर्विकास करण्याची म्हाडाची योजना आहे. पुनर्विकासात म्हाडाच्या संक्रमण शिबिरांच्या इमारतींसह ३० वर्षे जुन्या इमारतींचा समावेश केला जाणार आहे. म्हाडा याबाबतचा प्रस्ताव लवकरच गृहनिर्माण विभागाला पाठवणार असून मंजुरी मिळताच पुनर्विकासाच्या दृष्टीने पावले उचलली जातील.

प्रतीक्षा नगरमधील संक्रमण शिबिरात जवळपास साडेपाच हजार रहिवासी वास्तव्यास आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून येथील घुसखोरांचा प्रश्न प्रलंबित आहे. संक्रमण शिबिरातील मूळ भाडेकरूंना पुनर्विकासाअंतर्गत घरे दिली जाणार आहेत. मात्र, जे घुसखोर आहेत त्यांनाही न्यायालयाचा निकाल लागेपर्यंत संक्रमण सदनिका दिल्या जातील. त्यानंतर न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही केली जाईल, असे म्हाडाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

## मालमत्ता खरेदी-विक्रीसाठी आधार प्रमाणीकरण सक्तीचे; अधिसूचना लवकरच जारी होणार




**मुंबई :** मालमत्ता खरेदी आणि विक्रीशी संबंधित दस्तऐवजांच्या नोंदणी सेवांचा लाभ घेण्यासाठी आधार नोंदणी क्रमांक असणे सक्तीचे करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. याबाबतची अधिसूचना लवकरच जारी करण्यात येणार असून मालमत्ता खरेदी-विक्री करताना आधार कार्डशी आधारित ओळख निश्चित करण्याची प्रक्रिया नोंदणी आणि मुद्रांक विभागामार्फत केली जाणार आहे. सध्या मालमत्ता दस्तऐवजांची नोंदणी करताना आधार कार्डची प्रत मागितली जात असली, तरी त्याला कायदेशीर आधार नाही किंवा तशी सक्ती करता येत नाही. त्यामुळे प्रस्तावित अधिसूचना पेंद्र सरकारच्या आधार अधिनियम, २०१६ मधील कलम ७ अंतर्गत जारी केली जाणार आहे. त्यानुसार, संबंधित नोंदणी सेवांचा लाभ घेण्यासाठी आधार प्रमाणीकरण किंवा आधार क्रमांक असल्याचा पुरावा सादर करणे आवश्यक ठरणार आहे.

अद्याप आधार क्रमांक मिळालेला नसलेल्या व्यक्तींना आधार नोंदणीसाठी अर्ज करावा लागणार आहे. नागरिकांची ओळख निश्चित करणे, सेवा सुलभपणे उपलब्ध करून देणे हा या निर्णयामागील उद्देश असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

आधार क्रमांक नसलेल्या व्यक्तींसाठी अधिसूचनेत पर्यायी प्रक्रिया देण्यात आली आहे. आधार क्रमांक मिळेपर्यंत संबंधित लाभार्थी नोंदणी क्रमांक आणि निर्धारित ओळखपत्रांच्या आधारे सेवांचा लाभ घेऊ शकतील. प्रौढांसाठी निवडणूक आयोगाचे मतदार ओळखपत्र, शिधापत्रिका, पासपोर्ट, वाहनचालक परवाना, काही विशिष्ट सरकारी ओळखपत्रे, दिव्यांगत्व प्रमाणपत्रे आणि इतर निर्धारित कागदपत्रे स्वीकारली जाणार आहेत.

ज्या लाभार्थ्यांना आधार नोंदणी किंवा आधारमधील माहिती अद्ययावत करण्याची गरज आहे, त्यांना ही सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश नोंदणी आणि मुद्रांक विभागाला देण्यात आले आहेत. ही अधिसूचना नोंदणी आणि मुद्रांक विभागामार्फत करण्यात येणाऱ्या नोंदणी सेवांना लागू होणार आहे.

# मुंबईत ७० वर्षांवरील ज्येष्ठांना आयुष्यमान वय वंदना कार्ड;

## एमडीसी अभियानाचा शुभारंभ,महापालिकेच्यावतीने १०० दिवसांचा कार्यक्रम जाहीर

**मुंबई :** मुंबईत मुंबई डिजिहेल्थ कनेक्ट (एमडीसी) अभियान १०० दिवसांच्या कालावधीसाठी राबविण्यात येणार आहे. कालवधीसाठी महानगरपालिकेच्या सर्व प्रशासकीय विभागात राबविण्यात येणार आहे. अभियानअंतर्गत मुंबईतील अधिकाधिक पात्र नागरिकांचे आयुष्मान भारत हेल्थ अकाऊंट (आभा) कार्ड निर्माण करण्यावर भर देण्यात येणार आहे. त्यासोबतच ७० हून अधिक वयोमान असलेल्या जेष्ठ नागरिकांचे आयुष्यमान वय वंदना कार्ड तयार करण्याचेही उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

नागरिकांच्या आरोग्याच्या सुविधा उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने आभा कार्डची उपलब्धतता ही अत्यंत मदतीची ठरणार आहे. त्यामुळे आरोग्याच्या अनुषंगाने उपचारांची उपलब्धतता सहजरित्या होण्यासाठी हे महत्वाचे पाऊल ठरणार आहे. त्यामुळे अधिकाधिक मुंबईकरांनी या अभियानात सहभाग व्हावे, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य समितीचे अध्यक्ष हरिष भांदिर्गे यांनी केले आहे. मुंबईतील मोठ्या प्रमाणात नागरिकांना आभा कार्डच्या माध्यमातून फायदा व्हावा, याद्दष्टीने महानगरपालिकेच्या यंत्रेण्च्या माध्यमातून सुरू होणाऱ्या अभियानासाठी नागरिकांनी चांगला प्रतिसाद द्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

मुंबई डिजिहेल्थ कनेक्ट अभियानासाठी प्रामुख्याने वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांच्याकडे महत्वाची जबाबदारी असणार आहे. अधिकाधिक नागरिकांना आभा कार्डच्या नोंदणीमध्ये



समाविष्ट करून घेण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. प्रत्येक प्रशासकीय विभागाचे सहायक आयुक्त आणि उपायुक्त आभा कार्ड नोंदणी अभियानाच्या कामगिरीचा आढावा घेणार आहेत. नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित अत्यंत महत्वाच्या अभियानात मुंबईकर नागरिकांना सक्रियपणे सहभागी करून घेण्याचे निर्देश मुंबई महानगरपालिका आयुक्त आश्विनी भिडे यांनी दिले आहेत. सार्वजनिक आरोग्य विभागाने या अभियानाच्या माध्यमातून अधिकाधिक नागरिकांची नोंद आभा कार्ड नोंदणीसाठी करण्याच्या सूचना अतिरिक्त आयुक्त (शहर) प्राजक्ता लवंगारे यांनी दिल्या आहेत. महानगरपालिकेच्या सर्व आरोग्य संस्थांची हेल्थ फॅसिलिटी रजिस्ट्रीमध्ये नोंदणी करावी. तसेच सर्व पात्र डॉक्टर, परिचारिका, आयुष वैद्य, फार्मासिस्ट, फिजिओथेरपिस्ट आदींची हेल्थकेअर प्रोफेशनल रजिस्ट्रीमध्ये नोंदणी करण्याचे उद्दिष्ट ठेवावे, असे आवाहन अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त प्राजक्ता लवंगारे यांनी केले आहे.

**अभियानाची उद्दिष्टे**

आरोग्य नोंदी आयुष्यमान भारत हेल्थ अकाऊंट-आभाशी जोडणे आणि महानगरपालिका रूग्णांमध्ये बाह्यरूग्णसेवांमध्ये ,ई प्रस्क्रिप्शन, ई डिस्चार्ज समरी, डिजिटल लॅब / रेडिओलॉजी अहवाल आणि ईएमआर/ एचएमआयएस यासारख्या आयुष्मान डिजिटल भारत मिशनसोबतच्या सुसंगत डिजिटल सेवा वाडविणे ही अभियानाची उद्दिष्टे आहेत. मुंबई डिजिहेल्थ कनेक्ट (एमडीसी) अभियान एकूण तीन टप्प्यांमध्ये मुंबई डिजिहेल्थ कनेक्ट (एमडीसी) अभियानाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

पहिला टप्पा

पहिल्या टप्प्यात जनजागृती मोहीम, अधिकारी - कर्मचारी व स्वयंसेवकांचे प्रशिक्षण आणि स्वयंसेवक नोंदणी करण्यात येईल. तसेच प्रचार साहित्याचे वितरण करण्यात येईल.

# पनवेल-कर्जत दरम्यान ५० लोकल

**मुंबई :** बहुप्रतीक्षित पनवेल - कर्जत दरम्यान नवा उपनगरीय रेल्वे मार्ग डिसेंबर-२०२६ पर्यंत पूर्ण होणाऱ्या मार्गावर आहे. या मार्गावर पूर्ण क्षमतेने लोकल सेवा सुरू करण्याची तयारी रेल्वेकडून सुरू आहे. या मार्गावर पहिल्या टप्प्यात दिवसाला ५० लोकल धावणार असल्याची माहिती मध्य रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. ही मार्गिका सुरू झाल्यानंतर पनवेल-कर्जत प्रवासासाठी लागणारा अधिकचा कालावधी कमी होणार आहे.

मुंबई रेल्वे विकास महामंडळाने एमयूटीपी - ३ अंतर्गत २,७८२ कोटी रुपयांचा पनवेल - कर्जत दुहेरी रेल्वे मार्गिका उभारण्याचे काम हाती घेतले आहे. सध्या या प्रकल्पाचे जवळपास ९९ टक्के कामे पूर्ण झाले आहे.

हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर पनवेल- कर्जत दरम्यानची पयार्यी लोकल वाहतूक उपनगरीय रेल्वे प्रवाशांसाठी उपलब्ध होणार आहे. त्याचा मोठा फायदा मुंबईसह नवी मुंबई, कर्जतसाठी प्रवास करणाऱ्या प्रवाशांना होणार आहे.

या मार्गात ५ रेल्वे स्थानके...



सध्या पनवेल - कर्जतसाठी थेट उपनगरी रेल्वे जोडणी नसल्याने प्रवाशांना अधिक वेळ खर्च करून प्रवास करावा लागत होता. आता या मार्गावर पनवेल, चिखले, पोयंजे, चौक आणि कर्जत अशी पाच स्थानके असणार आहेत. तसेच या मार्गिकेवर तीन बोगदे आहेत. त्याची एकूण लांबी ३.१६४ किमी आहे. यापैकी २.६२५ किमी लांबीचा वावले बोगदा सर्वांत लांब बोगदा आहे. तसेच ५ उड्डाणपूले, १६ भुयारी मार्ग आहेत.

या मार्गावर नवीन पनवेल स्थानक कार्यान्वित झाले आहे. तसेच चिखले आणि पोयंजे स्थानकांची इमारत पूर्ण झाली आहे. शेवटच्या कर्जत स्थानकांवर फलाट, सक्युर्लेटिंग एरिया, कवर ओव्हर प्लॅटफॉर्म, उद्वाहक, सरकते जिने आणि इतर प्रवासी सुविधांची कामे अंतिम टप्प्यात आहेत.

**पहिल्या टप्प्यात ५० लोकल**

– या मार्गावर पूर्ण क्षमतेने लोकल सेवा सुरू करण्यासाठी तांत्रिक चाचण्या सुरू आहेत. अंतिम मान्यता मिळताच या मार्गावर पहिल्या टप्प्यात ५० लोकल धावणार आहेत. या सर्व लोकल १२ डब्यांच्या साधारण लोकल असणार आहेत. १५ डब्यांच्या गाड्या आणि एसी लोकलचा विचार दुसऱ्या टप्प्यात केला जाणार असल्याचे मध्य रेल्वेच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

**कर्जत प्रवाशांचा ३० मी. वेळ वाचणार...**

या मागार्मुळे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस आणि कर्जत यांच्यातील प्रवासाचा वेळ सुमारे ३० मिनिटांनी कमी होणार आहे. शिवाय या कपातीमुळे इतर स्थानकांवरील गर्दी कमी होण्यास मदत होणार आहे. कर्जत, भिवपुरी, नेरळ आणि खोपोली येथील हजारो प्रवाशांना प्रवास सुखकर होणार आहे.

## सोसायटीच्या पुनर्विकासासाठी ५१ टक्के सदस्यांची मान्यता हवीच, दहा वर्षांपूर्वीच्या कालबाह्य नियमांमध्ये महत्त्वाचे बदल

**मुंबई :** गृहनिर्माण संस्थांच्या कामकाजापासून पुनर्विकासातील बिल्डर आणि व्यवस्थापन समितीच्या मनमामी कारभाराला आळा घालण्यासाठी राज्याच्या



सहकार विभागाने सुधारित नियमावली जारी केली असून, कोणत्याही गृहनिर्माण संस्थेच्या पुनर्विकासासाठी आयोजित करण्यात येणाऱ्या विशेष सर्वसाधारण सभेत किमान ५१ टक्के सभासदांची उपस्थिती आणि ५१ टक्के सदस्यांच्या बहुमताची मान्यता बंधनकारक करण्यात आली आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्थेच्या अधिनियमानुसार इमारतींच्या पुनर्विकासाच्या संदर्भात ४ जुलै २०१९ रोजी कार्यपद्धती निश्चित केली होती, पण तरीही पुनर्विकासाच्या कामांमध्ये व सोसायटीच्या कामांमध्ये अनियमितता असल्याच्या तक्रारी सहकार विभागाकडे येत होत्या.पुनर्विकास प्रक्रियेत सदस्यांना विश्वासात न घेता एकतर्फी निर्णय घेतले जात होते. निविदा प्रक्रियेत पारदर्शकता नसायची, निविदा अंतिम करण्यासाठी योग्य त्या कार्यपद्धतीचा अवलंब केला जात नव्हता. मनमानी पद्धतीने विकासक व ठेकेदारांची नियुक्ती केली जात होती. त्यामुळे सरकारने नवी पुनर्विकासासाठी नवी नियमावली जारी केली आहे.

अशी आहे नवी नियमावली

♦ सर्वसाधारण सभेचा कोरम हा संस्थेच्या एकूण सभासद संख्येच्या २/३ इतका राहील. ♦ पुन्हासुद्धा कोरम पूर्ण न झाल्यास, ‘सभासदांना पुनर्विकासात रस नाही’ असे समजून सभा रद्द होईल आणि तो विषय पुढील ३ महिने पुन्हा सभेपुढे आणता येणार नाही. ♦ पुनर्विकास करायचा की नाही हा निर्णय घेण्यासाठी एकूण सभासदांच्या किमान ५१ टक्के सभासदांची मान्यता आवश्यक आहे. ♦ परदेशात असणारे, आजारपणाने अत्यवस्थ, विकलांग हे व्ही.सी.द्वारे सभेस उपस्थित राहू शकतील.

**प्रशासकाला निर्णय घेता येणार नाही**

सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या इमारतींच्या पुनर्विकासाचा निर्णय महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियमानुसार निवडून आलेल्या व कायद्यानुसार स्थापन झालेल्या संस्थेच्या व्यवस्थापक समितीला घेता येईल. तो निबंधकाने नियुक्त केलेल्या प्राधिकृत अधिकारी, प्रशासक, प्राधिकृत अधिकारी मंडळाला घेता येणार नाही.

पान नं १ वरुन

# नवरात्रोत्सवानिमित्त हिंदु युवतींसाठी ‘मैं हूँ दुर्गा’ अभियान

## हिंदु युवतींसाठी देशभरात अनेक ठिकाणी स्वसंरक्षण प्रशिक्षणवर्गांचे आयोजन!

➜ प्रशिक्षण वर्गामध्ये १५ वर्षांवरील युवतींसाठी प्रवेश दिला जाणार आहे. हिंदु जनजागृती समितीने अधिकाधिक हिंदु युवतींनी या अभियानात सहभागी होऊन विनामूल्य स्वसंरक्षण प्रशिक्षण घ्यावे, असे आवाहन केले आहे. स्वसंरक्षण प्रशिक्षणासाठी आपल्या शहरातील ‘मैं हूँ दुर्गा’ अभियानात सहभागी होण्यासाठी सोबत दिलेला क्यू आर कोड स्कॅन करून अथवा खालील लिंक वर जाऊन नोंदणी करावी, असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

**स्वसंरक्षण प्रशिक्षण वर्गांचा तपशील**

स्वसंरक्षण तंत्रांच्या प्रात्यक्षिकां सोबतच, हे प्रशिक्षण वर्ग सहभागींना संभाव्य धोके ओळखणे, योग्य वेळी योग्य निर्णय घेणे आणि मानसिक तसेच आध्यात्मिक प्रतिकारशक्ती विकसित करणे याबाबत मार्गदर्शन करतील. या प्रशिक्षण वर्गामध्ये १५ वर्षे आणि त्यावरील मुलींना प्रवेश खुला आहे. हिंदु जनजागृती



समितीने तरुण हिंदू युवतींना या अभियानात मोठ्या संख्येने सहभागी होऊन मोफत स्वसंरक्षण प्रशिक्षण घेण्याचे आवाहन केले आहे.

**आताच नोंदणी करा!**

तुमच्या शहरातील ‘मैं हूँ दुर्गा’ अभियानात सहभागी होण्यासाठी खालील लिंकवर क्लिक करा www. hindujagruti.org/hindi/navratri-festival

पान नं १ वरुन

## 'धारावी हे मोठे आर्थिक इंजिन' 'एक्सपिरियन्स सेंटर' चे उद्घाटन



धारावीची विद्यमान सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक ओळख जपत तिचे सर्वंकष नागरी परिवर्तन करण्याचा हा प्रयत्न आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात होत असलेल्या नागरी परिवर्तनाचे हे आदर्श उदाहरण आहे. धारावी पुनर्निर्माण प्रकल्प नेमका कसा असेल, आजची धारावी कशी आहे आणि भविष्यात तिचे स्वरूप कसे बदलणार आहे, याची 'रिअल टाइम' माहिती 'धारावी एक्सपिरियन्स सेंटर'मध्ये सर्वांना मिळणार आहे. यावेळी गायक शंकर महादेवन यांनी गायिलेल्या, 'धारावी का कल' या विशेष गीताचे लाँचिंग आणि 'मेरे सपनों की धारावी' या पुस्तकाचे प्रकाशनही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले.

## अभिजित दिपके च्या डोक्यात हवा; बेताल वक्तव्य थांबवली नाही तर दिपके विरुद्ध आर.पी.आय कडक पाऊल उचलेल

रिपब्लिकन पक्ष अभिजित दिपके विरुद्ध कडक पाऊल उचलेल असा इशारा रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी मुंबईत बांद्रा येथे पत्रकारांशी बोलताना दिला.काही विद्यार्थी तरुण अभिजित दीपके यांना पाठिंबा देत आहेत. ही चांगली बाब आहे. तरुणांच्या पाठिंब्याचा सदुपयोग करावा.वाढत्या पाठिंब्यामुळे त्यांच्या डोक्यात जास्त जावा शिरली आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकरांबद्दल चुकीचे वक्तव्य करण्यापर्यंत त्यांची मजल गेली आहे. दिपके यांनी चुकीचे बोलणे टाळावे;महनीय व्यक्तींवर ;लोकशाहीत बहुमताने निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींवर बेछूट टीका करताना बेताल वक्तव्य त्यांनी थांबवावित अन्यथा रिपब्लिकन पक्ष कडक भूमिका घेऊन त्यांना अस्मानातून जमिनीवर आणेल असा इशारा ना. रामदास आठवले यांनी दिला आहे.

## मुंबईत २०२९ पर्यंत दहा टक्के पाणीकपात

म्हणजेच मे महिन्यामध्येच सर्व तलाव सुकून जातील. त्यामुळे किमान जून अखेरपर्यंत पाण्याची बचत करायची असेल तर, किमान दहा टक्के पाणी कपात कायमस्वरूपी सुरू ठेवावी लागेल. यातून महिना १२ हजार दशलक्ष लिटर पाण्याची बचत होईल. तर ८ महिन्यात जवळपास १ लाख दशलक्ष लिटर पाण्याची बचत होऊ शकते. त्यामुळे मे महिन्यातील पाणीटंचाई महिनाभर पुढे ढकलता येऊ शकते.

**खारे पाणी गोड होईपर्यंत पाणीकपात**

पाण्याची बचत करताना पुढील पावसाळ्यापर्यंत पाणी पुरवण्यासाठी मुंबई महापालिकेने १० टक्के पाणी कपात २०२७ पर्यंत सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. पण तलावातील पाणी साठवण्याची क्षमता लक्षात घेता, ऑक्टोबर ते जुलैपर्यंत १० महिने पाणी पुरवणे अशक्य आहे. त्यामुळे गारगाई पाणीपुरवठा प्रकल्पासह समुद्राचे खारे पाणी गोडे करण्याचा प्रकल्प पूर्ण होईपर्यंत म्हणजेच २०२९ पर्यंत पाणी कपात कायम ठेवावी लागणार आहे.

२ लाख ५६ हजार दशलक्ष लिटर पाण्याचा तुटवडा लक्षात घेता दहा टक्के पाणी कपात कायमस्वरूपी लागू करूनही दहा महिने पाणी पुरवणे शक्य नाही. त्यामुळे येणाऱ्या काळात २० टक्के पाणी कपात लागू करणे भाग पडेल, असे मुंबई महानगरपालिकेच्या वरिष्ठ अभियंत्यांचे म्हणणे आहे.

**बाष्पीभवनाचीही समस्या गंभीर**

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या तलावातून दररोज ४,६३७ दशलक्ष लिटर पाण्याची उचल होते. त्याशिवाय भिवंडी व ठाणे शहरांना पुरवठा होणारे काही पाणी व बाष्पीभवनामुळे दररोज ५,६७८ दशलक्ष लिटर पाण्याची घट होत आहे.

महिना सरासरी १ लाख ७० हजार दशलक्ष लिटर पेक्षा जास्त पाण्याचा उपसा होतो. कपात न करता दहा महिने पाणी पुरवायचे झाल्यास १७ लाख १० हजार दशलक्ष लीटर पेक्षा जास्त पाण्याची गरज भासेल. तलावामध्ये १४ लाख ४७ हजार दशलक्ष लिटर पाणी साठवण्याची क्षमता आहे.

# धारावीतील सोशल नगर येथील मोकळ्या जागेवर कब्जा

## ▪ दमदाटी दादागिरी करुन दोन दुकाने बांधली ▪ स्थानिक समाजसेविकेचा विरोध ▪

## ▪ मुख्यमंत्री, पालिका आयुक्तांकडे या अनधिकृत बांधकामावर करवाई करुन तोडण्याची मागणी ▪











**प्रमुख मागण्याः**

- **अनधिकृत बांधकाम पाडणेः एम.आर.टी.पी. कायद्यांतर्गत (MRTP Act) आणि भारतीय न्याय संहितेनुसार दोषींवर कारवाई करून हे अनधिकृत बांधकाम तात्काळ निष्कासित करावे.**
- **मोकळी जागा पूर्ववत करणेः बळकावलेली जागा खाली करून ती मोकळी करावी.**
- **कुटुंबाला संरक्षणः भूमाफिया व ठेकेदारांकडून जीवितास धोका असल्याने पती-पत्नीला तात्काळ पोलीस संरक्षण द्यावे.**
- **या प्रकारामुळे धारावी परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. प्रशासकीय यंत्रणा यावर काय कारवाई करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**
- **याच्यातील कब्जाधारक असे दोन्ही गाळे ज्यांचे आहेत ते सुनिता उमकेरे आणि धारावी त बीएमसी पोलिसांचे साठे लोटे असणारे कॉन्ट्रॅक्टर माफिया**
- **मुख्यमंत्री आणि पालिका आयुक्त यांच्याकडे कारवाईची मागणी केली आहे.**

**▪ सदर ठिकाणी जानेवारी महिन्यापासून बांधकाम करणार असल्याची माहिती मिळत असल्याने आम्ही सहाय्यक पालिका आयुक्त 'जी' उत्तर विभाग तक्रार केली होती, १० फेब्रुवारी २०२६ रोजी महानगरपालिकेने स्थळ निरीक्षण केले आणि कारवाईचे आश्वासन दिले परंतु कारवाई केली नाही सदर धारावी पुनर्वसन प्रकल्प डी.आर.पी यांच्या अधिकाऱ्यांनाही तक्रारी देण्यात आल्या त्यांनीही कारवाई करण्याचे आश्वासन दिले परंतु कारवाई केली नाही पोलिसांनी मात्र अनधिकृत बांधकामावर आम्ही काहीच करू शकत नाही अशी भूमिका घेऊन त्यांनी आमचा अर्ज फक्त पालिकेला पाठवला प्रत्यक्षात अनधिकृत बांधकाम रोखण्यासाठी त्यांनी काम केले नाही समाजसेविका म्हणून मी काम करत असताना प्रशासनाने सदर बांधकामावर कोणतीच कारवाई केली नाही. याबाबत मी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री पालिका आयुक्त यांना निवेदन दिले आहे सदर अनाधिकृत बांधकामावर पूर्ण चौकशी करून कारवाई करण्यात यावी अन्यथा याबाबत मला आमरण उपोषण आझाद मैदानात करावे लागेल याची प्रशासनाने नोंद घ्यावी. समाजसेविका-सितारा बेगम सय्यद**

धारावीतील प्रभाग क्रमांक १८५ येथे असलेल्या एमजे रोड वर असलेल्या सोशल नगर झोपडपट्टी परिसरात मारिया मा मंदिराच्या समोर असलेल्या झोपडपट्ट्यांचे नाला रुंदीकरण करण्याच्या दृष्टीने नाल्यावरील दुकान आणि मकान यांचे स्थलांतर करून त्यांना इतर इमारतीमध्ये दुकान आणि घर देण्यात आलेले आहे.

याच प्रकारे सोशल नगर नाला येथील अनेक रहिवाशांचे नेत्रा वाला बिल्डिंग आणि अन्यत्र नाल्यावरील रहिवाशांचे शिफ्टिंग करण्यात आले आहे त्यांना नाल्याच्या जागेबद्दल चित्र तर घर मिळाले आहे.

ज्याचे घर असेल त्यांना घर मिळाले आहे तर ज्याचे दुकान असतील त्यांना दुकान हे मिळालेले आहे. परंतु नाल्यावर असलेल्या झोपड्या आणि दुकान धारकांना शिफ्टिंग मिळालेले आहे त्यांना दुकानाच्या बदल्यात दुकान आणि घराच्या बदल्यात घर मिळालेले आहे परंतु सरकारची ही जागा मोकळी असल्याचे लक्षात आल्याने एकीकडे सरकारकडून योजनेचा फायदाही मिळवायचा आणि दुसरीकडून जबरदस्ती बेकायदेशीर बांधकाम करत त्या जागेवर दुकान ही बांधायचे असे काम परिसरात सुरू आहे याबाबत परिसरातील एका अज्ञात महिलेने सदर अनधिकृत बांधकामात बाबत आवाज उठविला तिने सांगितले की सरकारची योजना मिळाली घर मिळाले दुकान मिळाला शिफ्टिंग मिळाले तरी मात्र दुसऱ्याच्या जागेवर येऊन घरामध्ये लोखंडी अँगल घुसवून जबरदस्ती दादागिरी करून पालिकेच्या काही अधिकाऱ्यांना हाताशी धरून बिनधास्त अनाधिकृत बांधकाम करत आहेत. याबाबत आम्ही पालिका आयुक्तांना पत्र दिले आहे आणि कारवाई करण्याची मागणी केली आहे लवकरात लवकर कारवाई करावी अशी मागणी परिसरातील नागरिकांनीही केली आहे असे या महिने ने सांगितले आहे याबाबत ताबडतोब सदर बेकायदेशीर बांधकाम केलेले बांधकाम ताबडतोब पाडली जावी आणि जागा मोकळी करावी अशी मागणी सध्या जोर पकडत आहे.







# विजयादशमी

विजयादशमी म्हणजेच आश्विन शुद्ध दशमी हा दिवस भारतीय संस्कृतीत महत्वाचा मानला जातो. याच दिवसाला दसरा असेही म्हटले जाते. देवीच्या घटांची स्थापना आश्विन शुद्ध प्रतिपदेला केल्यानंतर देवीचे नवरात्र साजरे होते. आणि दहाव्या दिवशी विजयादशमी साजरी करण्यात येते.

**दसरा**– विद्येची देवता मानल्या गेलेल्या सरस्वती देवीचे पूजन या दसऱ्याच्या दिवशी विशेषत्वाने केले जाते. याच दिवशी अपराजिता देवीची पूजा करतात. दसऱ्याच्या दिवशी गावाच्या सीमा ओलांडून जाण्याची प्रथा प्रचलित आहे . लोक या दिवशी परस्परांनासोने म्हणून आपट्याची पाने देतात. सायंकाळी गावाची सीमा ओलांडून ईशान्येस जायचे, शमीच्या किंवा आपट्याच्या झाडाची पूजा करायची, तेथे अष्टदल रेखाटून त्यावर अपराजिता देवीची स्थापना करावयाची आणि तिला प्रार्थना करावयाची की, मला विजयी कर. त्यानंतर योद्धयांनी शस्त्र पूजन, व्यापाऱ्यांनी व्यापारासाठी प्रयाण व विद्यार्थ्यांनी सरस्वतीपूजन करायचे अशी प्रथा होती. मुले पाटीवर सरस्वतीचे प्रतीकात्मक चित्र काढून त्या पाटीची पूजा करतात. पुस्तकांची आणि वह्यांचीही पूजा होते.




प्रारंभी हा एक कृषिविषयक लोकोत्सव होता. पेरलेल्या शेतातील पहिले पीक यावेळी घरात येई, त्यावेळी शेतकरी हा उत्सव करीत असत. ग्रामीण भागात शेतातील धान्याचा तुरा आपल्या फेट्यात लावण्याची पद्धतीही प्रचलित आहे. काही लोक ते कानांवर खोचतात तर काही टोपीवर लावतात.

साडेतीन मुहूर्तातील एक मुहूर्त मानल्या गेलेल्या विजयादशमीला शुभ कार्ये करतात. नवी वाहने, वास्तू तसेच कपड्यांची खरेदी,सोन्याची खरेदी होते.

**पौराणिक आख्यायिका**

श्रीरामाने विजया दशमीच्या दिवशी रावणाचा वध केला अशी आख्यायिका प्रचलित आहे.

या दिवशी पांडव अज्ञातवास संपवून परत निघाले अशीही आख्यायिका आढळून येते.पांडवांनी अज्ञातवासात जाण्यापूर्वी आपली शस्त्रे शमीच्या झाडावरील एका ढोलीत लपवून ठेवली होती. त्यापैकी गांडीव धनुष्य आणि काही बाण बृहन्नडेच्या रूपात असलेल्या अर्जुनाने विराटाच्या गाई सोडवून आणण्यासाठी वापरले आणि त्या कामगिरीनंतर परत झाडावर ठेवून दिले अशी कथा आढळून येते.त्यामुळे विजयादशमीला शमीची पूजा करून त्याला औक्षण केले जाते.

विजयादशमी या दिवशी ज्या वृक्षाची पाने लुटली जातात त्या वृक्षाला अश्मंतक असे म्हणतात. ही पाने पित्त व कफ दोषांवर गुणकारी आहेत.

**उत्तर भारत** – उत्तर भारतात हिमालयाच्या कुशीत कुलू घाटीत दसऱ्याचा उत्सव सात दिवस साजरा होतो. यावेळी रघुनाथाची यात्रा केली जाते. रामलीला सादरीकरण हा नवरात्रीतील नाट्यविशेष उत्तर भारतात प्रचलित आहे. नऊ दिवस चालूं असलेल्या रामलीला नाटिकेची सांगता विजयादशमीला रावणवधाने केली जाते. यावेळी रावणाचा मोठा पुतळा उभारून त्याचे दहन करतात.कुलू शहरातला दसरा वैशिष्ट्यपूर्ण असतो. या दिवशी मिरवणुकीची सुरुवात रघुनाथजी यांच्या पूजनाने केली जाते.

गुजरात - सोमनाथ आणि द्वारका येथे दसरा साजरा होतो. दसऱ्याला जुनागड संस्थानातील देवीची ब्राह्मण पुरोहिताच्या हस्ते पूजा केली जाते.

**छत्तीसगड** – छत्तीसगडमधील बस्तर या ठिकाणी साधारण अडीच महिने दसरा साजरा होतो. हा उत्सव दंतेश्वरी या देवतेचा उत्सव मानला जातो. रामाने रावणावर मिळविलेला विजय याला या भागात महत्त्व दिले जाते.

**महाराष्ट्र** – महाराष्ट्रात कातकरी आदिवासी स्त्रिया या दिवशी विशिष्ट नाच करतात. त्याला दसरा नृत्य असे म्हणतात.तसेच बंजारा समाजातील लोक शस्त्रपूजा व शेतीतील लोखंडी अवजारांची पूजा करतात.

घराला आंब्याच्या पानांचे आणि झेंडूच्या फुलांचे तोरण लावतात. दसऱ्याला झेंडूच्या फुलांनी पूजा करण्याची प्रथा आहे. यंत्रे,वाहने यांना झेंडूच्या फुलांच्या माळा घालतात.

**विजयादशमी सरस्वतीपूजन**

**पंजाब**– पंजाबमध्ये दसऱ्याच्या दिवशी रावणदहन करतात. लोक परस्परांना मिठाई भेट देतात.

**दक्षिण भारत**– आंध्र प्रदेश, तामिळनाडू, कर्नाटक येथे नऊ दिवसात दर तीन दिवशी देवीच्या एकेका रूपाची पूजा केली जाते.

# श्रद्धा और भक्तिभाव के साथ करें श्री दुर्गादेवी की उपासना!

हिन्दू धर्म में श्री दुर्गादेवी को आदिशक्ति के स्वरूप में पूजनीय माना गया है। नवरात्र सहित विभिन्न धार्मिक अवसरों पर भक्त देवी की उपासना कर सुख, शांति, शक्ति और कल्याण की प्रार्थना करते हैं। देवी के गुणों तथा पूजा-विधि से संबंधित जानकारी होने से उपासना के प्रति श्रद्धा और भक्ति-भाव बढ़ने में सहायता मिलती है। इसी उद्देश्य से इस लेख में श्री दुर्गादेवी के कुछ विशेष गुण तथा उसकी उपासना से संबंधित उपयोगी आध्यात्मिक जानकारी दी गई है।

**सर्वमंगलमांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके ।**
**शरण्ये त्र्यंबके गौरि नारायणि नमोऽस्तुते ॥**

हे नारायणी देवी! आप सब मंगलों की मंगलस्वरूप हैं, स्वयं कल्याणकारी शिवस्वरूप हैं, धर्म, अर्थ, काम और मोक्ष इन चारों पुरुषार्थों को प्रदान करनेवाली हैं, शरण देने योग्य हैं, त्रिनेत्रवाली हैं । आपको मेरा नमस्कार है।

भक्तों की पुकार पर दौड़कर आनेवाली देवी ! : सर्वस्वरूपिणी, विश्वस्वामिनी और सर्वशक्तिशाली ऐसी माता जगदंबा ने कार्यानुसार श्री महाकाली, श्री महालक्ष्मी और श्री महासरस्वती के विभिन्न रूप धारण किए। शरणागत को तुरंत स्वीकार करनेवाली, मंगल प्रदान करनेवाली, जीवन को परिपूर्ण बनानेवाली प्रत्येक तत्व का प्रतीक और भक्तों की पुकार पर तुरंत प्रकट होनेवाली, ऐसी ही माता जगदंबा की ख्याति है। असंख्य भक्तों को इसका अनुभव हुआ है।

देवी की पूजा कैसे करें? : देवी के किसी भी रूप की पूजा करते समय उसे अनामिका (करंगली के पास की उंगली) से चंदन लगाएं।

देवी को हल्दी-कुंकुम अर्पित करते समय पहले हल्दी और बाद में कुंकूम, दाएँ हाथ के अंगूठे और अनामिका की चिमटी में लेकर देवी के चरणों पर चढ़ाएं।

अंगूठा और अनामिका से बननेवाले मुद्रा से उपासक के शरीर का अनाहतचक्र जागृत होता है और भक्ति-भाव बढ़ता है।

देवी के विभिन्न रूपों को कौन से फूल अर्पित करें? : विशिष्ट देवता को विशिष्ट गंधवाले फूल, विशिष्ट संख्या में अर्पित करने से उस देवता का तत्त्व शीघ्र आकर्षित होता है।

**श्री दुर्गादेवी : मोगरा**
**श्री लक्ष्मीदेवी : कमल, गेंदे का फूल**
**श्री रेणुकादेवी : बकुल**
**श्री भवानीदेवी : भुमिकमल**
**श्री सप्तशृंगीदेवी : कवठी चंपा**
**श्री योगेश्वरीदेवी : सोनचाफा**

फूल नौ या नौ के गुणांक में और वतुर्लाकार में होने चाहिए। वर्तुल का मध्य भाग रिक्त रहना चाहिए। देवी को इत्र अर्पित करते समय मोगरे का इत्र होना चाहिए।

देवी को अगरबत्ती कौन सी चढ़ानी चाहिए? : चंदन, मोगरा, केवड़ा, चंपा, चमेली, जूही, वला, रातरानी और अंबर इन गंधों की ओर देवी का तत्त्व शीघ्र आकर्षित होता है।



अगरबत्ती से देवी को आरती करने की विधि : भक्ति के प्रारंभिक चरण में (द्वैत अवस्था) दो अगरबत्तियों से आरती करनी चाहिए। आगे के चरण में (अद्वैत भाव की ओर जाते हुए) एक अगरबत्ती से आरती करनी चाहिए। आरती करते समय अगरबत्ती दाएँ हाथ की तर्जनी और अंगूठे से पकड़कर घड़ी की दिशा में तीन बार घुमानी चाहिए।

देवी को कितनी परिक्रमा करनी चाहिए? : देवी की परिक्रमा सदैव विषम संख्या (१, ३, ५, ७) में करनी चाहिए। प्रत्येक परिक्रमा के बाद देवी को नमस्कार करना चाहिए।

देवी को कुंकुमार्चन करना : देवी की उपासना में एक विशेष विधि है 'कुंकुमार्चन'। देवी का नामजप करते हुए एक-एक चुटकी कुमकुम (सिंदूर) चरणों से लेकर मस्तक तक अर्पित करना अथवा कुमकुम से स्नान कराना ही 'कुंकुमार्चन' है। कुमकुम शक्ति का प्रतीक है। इसमें देवीतत्त्व ग्रहण करने की क्षमता अधिक होती है। इस कारण देवी की मूर्ति का शक्तितत्व कुमकुम में आ जाता है और भक्त इसे लगाकर देवी की शक्ति प्राप्त करता है।

आंचल भरना : देवी माँ का आंचल लाल रंग का वस्त्र और साड़ी से भरना चाहिए, क्योंकि लाल रंग में शक्तितत्त्व आकर्षित करने की क्षमता सबसे अधिक होती है।

नौ गज कबसाड़ी अर्पण करना श्रेष्ठ है, क्योंकि यह दुर्गादेवी के नौ रूपों का प्रतीक है। इसे अर्पित करने से देवी को उसके नौ रूपों के साथ प्रकट होकर कार्य करने का आवाहन किया जाता है।

देवी को सूती या रेशमी साड़ी अर्पित करने का महत्व : सूती या रेशमी धागों में सात्त्विक तरंगें ग्रहण और संचित करने की क्षमता अधिक होती है। इसलिए देवी को भेंट चढ़ाते समय उसे सूती या रेशमी साड़ी अर्पण करनी चाहिए। नारियल शुभसूचक है, उसे भी अर्पण करना चाहिए।

देवी का आंचल कैसे भरें? : थाली में साड़ी रखकर उस पर वस्त्र और फिर नारियल रखें। दोनों हाथों में लेकर, नारियल की शिखा देवी की ओर रखते हुए, छाती के सामने खड़े होकर भावपूर्वक प्रार्थना करें और साड़ी, वस्त्र और नारियल देवी के चरणों में अर्पित करें। इससे नारियल की शिखा की ओर देवी का तत्त्व आकृष्ट होकर साड़ी और कपड़े में संचारित होता है।

देवी के चरणों पर अर्पित वस्त्र पहनने का लाभ : आंचल भरने के बाद देवी के चरणों पर अर्पित वस्त्र प्रसादस्वरूप धारण करें और नारियल प्रसादस्वरूप ग्रहण करें। ऐसा करने से शरीर के चारों ओर संरक्षण कवच बनता है और शरीर की शुद्धि होती है। जितना अधिक भाव होगा, उतना अधिक समय तक सात्त्विकता बनी रहेगी।

# धन और ज्ञान मात्र संग्रह ही नहीं, सदुपयोग भी जरूरी है

एक गांव में धर्मदास नामक एक व्यक्ति रहता था। बातें तो बड़ी ही अच्छी-अच्छी करता था पर था एकदम कंजूस। कंजूस भी ऐसा वैसा नहीं बिल्कुल मक्खीचूस। चाय की बात तो छोड़ो, वह किसी को पानी तक के लिये नहीं पूछता था। साधु-संतों और भिखारियों को देखकर तो उसके प्राण ही सूख जाते थे कि कहीं कोई कुछ मांग न बैठे। एक दिन उसके दरवाजे पर एक महात्मा आए और धर्मदास से सिर्फ एक रोटी मांगी। पहले तो धर्मदास ने महात्मा को कुछ भी देने से मना कर दिया लेकिन तब वह वहीं खड़ा रहा तो उसे आधी रोटी देने लगा। आधी रोटी देखकर महात्मा ने कहा कि अब तो मैं आधी रोटी नहीं, पेट भरकर खाना खाऊंगा। इस पर धर्मदास ने कहा कि अब वह कुछ नहीं देगा। महात्मा रातभर चुपचाप भूखा-प्यासा धर्मदास के दरवाजे पर खड़ा रहा।




सुबह जब धर्मदास ने महात्मा को अपने दरवाजे पर खड़ा देखा तो सोचा कि अगर मैंने इसे भरपेट खाना नहीं खिलाया और यह भूख-प्यास से यहीं पर मर गया तो मेरी बदनामी होगी। बिना कारण साधु की हत्या का दोष लगेगा। धर्मदास ने महात्मा से कहा कि बाबा तुम भी क्या याद करोगे, आओ पेट भरकर खाना खा लो। महात्मा भी कोई ऐसा वैसा नहीं था। धर्मदास की बात सुनकर महात्मा ने कहा कि अब मुझे खाना नहीं खाना। मुझे तो एक कुआं खुदवा दो। लो अब कुआं कहां से बीच में आ गया धर्मदास ने साधु महाराज से कहा। धर्मदास ने कुंआ खुदवाने से साफ मना कर दिया। साधु महाराज अगले दिन फिर रातभर चुपचाप भूखा-प्यासा धर्मदास के दरवाजे पर खड़ा रहा।

अगले दिन सुबह भी जब धर्मदास ने साधु महात्मा को भूखा-प्यासा अपने दरवाजे पर ही खड़ा पाया तो सोचा कि अगर मैंने कुआं नहीं खुदवाया तो यह महात्मा इस बार जरूर भूखा-प्यासा मर जाएगा और मेरी बदनामी होगी। धर्मदास ने काफी सोच-विचार किया और महात्मा से कहा कि साधु बाबा, मैं तुम्हारे लिये एक कुआं खुदवा देता हूं और इससे आगे अब कुछ मत बोलना। नहीं, एक नहीं अब तो दो कुएं खुदवाने पड़ेंगे, महात्मा की फरमाइशें बढ़ती ही जा रही थी। धर्मदास कंजूस जरूर था, बेवकूफ नहीं। उसने सोचा कि अगर मैंने दो कुएं खुदवाने से मना कर दिया तो यह चार कुएं खुदवाने की बात करने लगेगा इसलिए रामदयाल ने चुपचाप दो कुएं खुदवाने में ही अपनी भलाई समझीं। कुएं खुदकर तैयार हुए तो उनमें पानी भरने लगा। जब कुओं में पानी भर गया तो महात्मा ने धर्मदास से कहा, दो कुओं में से एक कुआं में तुम्हे देता हूं और एक अपने पास रख लेता हूं। मैं कुछ दिनों के लिये कहीं जा रहा हूं लेकिन ध्यान रहे, मेरे कुओं में से तुम्हें एक बूंद पानी भी नहीं निकालना है। साथ ही अपने कुएं में से गांव वालों को रोज पानी निकालने देना है। मैं वापस आकर अपने कुएं से पानी पीकर प्यास बुझाऊंगा।

धर्मदास ने महात्मा वाले कुएं के मुंह पर एक मजबूत ढक्कर लगवा दिया। सब गांव वाले रोज धर्मदास वाले कुएं से पानी भरने लगे। लोग खूब पानी निकालते पर कुएं में पानी कम न होता। शुध्द-शीतल जल पाकर गांव वाले निहाल हो गये थे और महात्माजी का गुणगान करते न थकते थे। एक वर्ष के बाद महात्मा पुनः- उस गांव में आए और धर्मदास से बोले कि उसका कुआं खोल दिया जाए। धर्मदास ने कुएं का ढक्कन हटवा दिया। लोग यह देखकर हैरान रह गये कि कुएं में एक बूंद भी पानी नहीं था।

महात्मा ने कहा, कुएं से कितना भी पानी क्यों न निकाला जाए, वह कभी खत्म नहीं होता अपितु बढ़ता जाता है। कुएं का पानी न निकालने पर कुआं सूख जाता है, इसका स्पष्ट प्रमाण तुम्हारे सामने है। और यदि किसी कारण से कुएं का पानी न निकालने पर पानी नहीं भी सूखेगा तो वह सड़ अवश्य जायेगा और किसी काम में नहीं आयेगा।

## नाड़ी और सूक्ष्म शरीर का क्या है संबंध?

योग में शरीर की नाड़ियों को जीवन का आधार माना गया है क्योंकि मनुष्य की प्राण ऊर्जा इन्हीं नाड़ियों में प्रवाहित होती है। योग शास्त्र के अनुसार, शरीर में ७२,००० नाड़ियाँ हैं और उनमें से इड़ा, पिंगला और सुषुम्ना को विशेष महत्व दिया गया है। अध्यात्म के अनुसार, हर व्यक्ति के लिए नाड़ी तंत्र की व्यवस्था को समझना जरूरी है क्योंकि यह आपको अपने भीतर की स्थिति के प्रति जागरूक करता है। अपनी सांस पर ध्यान देना, यह देखना कि मन कब शांत है और कब अत्यधिक सक्रिय, तथा अपने शरीर और मानसिक अवस्था को समझना योग साधना का महत्वपूर्ण हिस्सा है।

शरीर की नसों और नाड़ियों में क्या अंतर है और इसका सूक्ष्म शरीर से क्या सम्बन्ध है?

योग और तंत्र परंपरा में मानव शरीर को केवल दिखाई देने वाले भौतिक शरीर तक सीमित नहीं माना गया है। इसमें शरीर को तीन भागों में बांटा गया है, जिसमें से एक सूक्ष्म शरीर है। सूक्ष्म शरीर कोई भौतिक शरीर नहीं बल्कि भौतिक शरीर के अन्दर मौजूद चेतनात्मक शरीर है, जिसमें प्राण ऊर्जा यानी जीवन ऊर्जा के प्रवाह का वर्णन मिलता है। यह जीवन ऊर्जा अनेक नाड़ियों की मदद से पूरे शरीर में दौड़ता है। लोग अक्सर नाड़ी को शरीर की नसें या धमनियां समझ लेते हैं, जबकि नाड़ी शरीर के नसों की तुलना में बेहद सूक्ष्म होते हैं। यही कारण है कि ये सूक्ष्म शरीर में मौजूद होते हैं, जिन्हें विज्ञान के नजरिये से नहीं बल्कि अध्यात्म और आयुर्वेद के नजरिये से देखा जाता है। योग दर्शन में नाड़ियों को ऐसे सूक्ष्म मार्ग के रूप में समझाया गया है, जिनके माध्यम से प्राण का प्रवाह होता है। इसलिए आधुनिक चिकित्सा विज्ञान में जिस नाड़ी की बात होती है और योग शास्त्र में जिस नाड़ी का वर्णन है, दोनों को एक ही चीज मानना उचित नहीं है। ग्रंथों में मानव के सूक्ष्म शरीर में नाड़ियों की संख्या ७२,००० बताई गयी हैं। इन अनेक नाड़ियों में कुछ को प्रमुख माना गया है और उनमें भी तीन नाड़ियों का विशेष महत्व बताया गया है - इड़ा, पिंगला और सुषुम्ना। तो, चलिए पहले इन तीनों नाड़ियों के बारे में समझते हैं...

**इड़ा नाड़ी क्या है?**

इड़ा को योग परंपरा में चंद्र नाड़ी कहा जाता है। इसका संबंध शीतलता, शांति, अंतर्मुखता और ग्रहणशीलता जैसे गुणों से जोड़ा जाता है। योग के अनुसार इड़ा शरीर के बाईं ओर से संबंधित मानी जाती है और इसका संबंध बाएं नथुने से बताया जाता है। जब इड़ा का प्रभाव प्रमुख माना जाता है, तब ध्यान, अध्ययन, आत्मचिंतन और शांत गतिविधियों के लिए यह अवस्था अनुकूल मानी जाती है। इड़ा को चंद्र ऊर्जा से जोड़ने के कारण इसे मन की शांति और शीतल स्वभाव का प्रतीक भी माना जाता है।

# आपकी प्रकृति (वात, पित्त, कफ) आपके स्वास्थ्य को कैसे प्रभावित करती है?

**आज की तेज रफ्तार जीवनशैली में अधिकांश लोग स्वस्थ रहने के लिए एक जैसा भोजन, व्यायाम या स्वास्थ्य संबंधी सलाह का पालन करते हैं। फिर भी कई बार एक ही उपाय किसी व्यक्ति के लिए लाभकारी होता है, जबकि दूसरे पर उसका अपेक्षित प्रभाव नहीं पड़ता। आयुर्वेद हजारों वर्षों पहले ही इस तथ्य को स्वीकार कर चुका था।**

आयुर्वेद के अनुसार प्रत्येक व्यक्ति की शारीरिक और मानसिक बनावट अलग होती है, जिसे 'प्रकृति' कहा जाता है। यही प्रकृति यह निर्धारित करती है कि हमारा पाचन कैसा होगा, ऊर्जा का स्तर कैसा रहेगा, किन रोगों की संभावना अधिक होगी और कौन-सी जीवनशैली हमारे लिए सबसे उपयुक्त होगी।

आयुर्वेद में शरीर के संचालन का आधार तीन दोष–वात, पित्त और कफ–माने गए हैं। ये केवल रोगों के कारण नहीं बल्कि शरीर की सामान्य कार्यप्रणाली के भी आधार हैं। गर्भधारण के समय इन दोषों के अनुपात से व्यक्ति की मूल प्रकृति बनती है, जो जीवनभर समान रहती है। हालांकि खान-पान, तनाव, मौसम और दिनचर्या के कारण इन दोषों का संतुलन बिगड़ सकता है और यही असंतुलन अनेक स्वास्थ्य समस्याओं का कारण बनता है।वात दोष शरीर की सभी गतिशील क्रियाओं का नियंत्रक है। श्वसन, रक्त संचार, तंत्रिका तंत्र, विचारों की गति और शरीर की गतिविधियाँ वात से प्रभावित होती हैं। वात प्रकृति वाले लोग प्रायः रचनात्मक, ऊर्जावान और जल्दी सीखने वाले होते हैं। लेकिन अनियमित दिनचर्या, नींद की कमी या अधिक यात्रा के कारण वात बढ़ने पर गैस, कब्ज, जोड़ों में दर्द, त्वचा का रूखापन, चिंता और अनिद्रा जैसी समस्याएँ हो सकती हैं। ऐसे लोगों के लिए नियमित समय पर भोजन, पर्याप्त विश्राम, गर्म एवं ताजा भोजन, अभ्यंग, योग और ध्यान विशेष रूप से लाभकारी माने जाते हैं।

पित्त दोष शरीर के पाचन, चयापचय, शरीर के तापमान और हार्मोनल गतिविधियों से जुड़ा है। पित्त प्रकृति वाले लोग सामान्यतः आत्मविश्वासी, निर्णय लेने में सक्षम और लक्ष्य केंद्रित



होते हैं। उनकी पाचन शक्ति अच्छी होती है, लेकिन पित्त बढ़ने पर एसिडिटी, सीने में जलन, त्वचा संबंधी समस्याएँ, अत्यधिक पसीना और चिड़चिड़ापन हो सकता है। इनके लिए समय पर भोजन करना, पर्याप्त जल पीना, अत्यधिक तीखे एवं तले भोजन से बचना तथा मानसिक शांति बनाए रखना आवश्यक माना जाता है।

कफ दोष शरीर को स्थिरता, पोषण, मजबूती और रोग प्रतिरोधक क्षमता प्रदान करता है। कफ प्रकृति वाले लोग शांत, धैर्यवान और सहनशील होते हैं। हालांकि शारीरिक गतिविधि कम होने या भारी भोजन के कारण कफ बढ़ने पर वजन बढ़ना, सुस्ती, पाचन धीमा होना, एलर्जी और बार-बार सर्दी-जुकाम जैसी समस्याएँ हो सकती हैं। नियमित व्यायाम, हल्का एवं सुपाच्य भोजन और सक्रिय जीवनशैली इनके लिए विशेष रूप से उपयोगी है।

यह समझना भी आवश्यक है कि बहुत से लोग केवल वात, पित्त या कफ प्रकृति के नहीं होते, बल्कि दो दोषों के मिश्रण वाली प्रकृति भी सामान्य है। इसलिए किसी भी स्वास्थ्य सलाह को अपनाने से पहले अपनी प्रकृति को समझना महत्वपूर्ण है। आयुर्वेद में आहार, दिनचर्या, योग, औषधि और ऋतुचर्या की सलाह भी व्यक्ति की प्रकृति के अनुसार दी जाती है। यही कारण है कि आयुर्वेद को आज व्यक्तिगत स्वास्थ्य देखभाल की प्राचीन और वैज्ञानिक अवधारणा माना जा रहा है।

आज जीवनशैली से जुड़ी बीमारियाँ तेजी से बढ़ रही हैं। ऐसे समय में अपनी प्रकृति के अनुरूप जीवनशैली अपनाना केवल रोगों से बचाव का माध्यम नहीं, बल्कि दीर्घकालिक स्वास्थ्य का आधार है। संतुलित आहार, पर्याप्त नींद, नियमित व्यायाम, तनाव प्रबंधन और ऋतु के अनुसार दिनचर्या अपनाकर दोषों का संतुलन बनाए रखा जा सकता है। आयुर्वेद हमें यह सिखाता है कि वास्तविक स्वास्थ्य केवल रोगों की अनुपस्थिति नहीं, बल्कि शरीर, मन और चेतना के बीच सामंजस्य स्थापित करने में है। जब हम अपनी प्रकृति के अनुरूप जीवन जीते हैं, तभी स्वस्थ, संतुलित और ऊर्जावान जीवन की दिशा में आगे बढ़ते हैं।

# वेदों में ईश्वर के बारे में क्या कहा गया है? क्या वेद ईश्वर के सत्ता के रहस्य को समझ पाया है?



हिन्दू धर्म में वेदों को सबसे प्राचीन और विश्वसनीय धार्मिक और दार्शनिक ग्रंथों में गिना जाता है। वेदों में लिखी बातें बहुत हद तक हिन्दू धर्म का आधार है लेकिन आज ईश्वर को लेकर अलग-अलग विश्वास है, सम्प्रदाय और मान्यताएं हैं, ईश्वर के अलग-अलग स्वरूप और शक्तियां हैं। तो, क्या वेद ईश्वर से जुड़ी इन मान्यताओं का समर्थन करता है या ईश्वर को लेकर उसकी अवधारणा बहुत ही अलग है? धार्मिक पुराणों में ईश्वर के रूप, गुण, शक्तियों इत्यादि का बखान मिलता है, लेकिन क्या वेद भी ईश्वर को इसी तरह दर्शाता है? वेदों में आखिर ईश्वर के बारे में क्या बताया गया है और आज की मान्यताओं से वह कितना अलग है, चलिए जानते हैं...वेदों में ईश्वर की व्याख्या

आज हिन्दू समाज भले ही अलग-अलग देवी-देवताओं की मूर्तियाँ बनाकर उनकी पूजा कर रहा है, लेकिन वेदों में पुराणों की तरह ईश्वर की महिमा और शक्तियों का बखान नहीं मिलता है। वेदों में ईश्वर को अनंत, निराकार, सर्वव्यापी और सच्चिदानंद स्वरूप जरूर बताया गया है, लेकिन वेदांत दर्शन ईश्वर को निर्गुण और सत्ताहीन ब्रह्म भी मानता है। वेदों के अनुसार ईश्वर के पास कोई शक्तियां नहीं है, कोई गुण या उसकी प्रकृति नहीं है, जिससे वो चमत्कार कर सके या खुद की उपस्थिति दर्शा सके। जबकि वहीं पुराणों में सगुण रूपों (शिव, विष्णु, शक्ति आदि) की उपासना का महत्व बताया गया है, जिनके पास खास प्रकृति और शक्तियां हैं।

ऋग्वेद में ईश्वर के सगुणी होने या अनेक रूपों के होने के बजाय आत्मा और परमात्मा के एकत्व पर जोर दिया गया है। 'अहं ब्रह्मास्मि' जैसे मंत्र इस बात की व्याख्या करते हैं कि आत्मा और परमात्मा में कोई भेद नहीं किया गया है। जो स्वयं को जानता है, वह ईश्वर को भी जानता है क्योंकि ईश्वर केवल एक चेतना हैं जो सम्पूर्ण ब्रह्माण्ड में हो रही घटनाओं के साक्षी हैं। ऐसा नहीं है कि वेदों में देवताओं का वर्णन नहीं मिलता, बल्कि वेदों में प्रकृति से जुड़े अग्नि, इंद्र, वरुण, सूर्य, उषा आदि देवताओं की स्तुतियां मिलती हैं। लेकिन वेदों में ऐसे गहरे दार्शनिक विचार भी हैं जो एक परम सत्य और सृष्टि के मूल कारण को समझने का प्रयास करते हैं। वेदों में देवताओं के लिए 'देव' शब्द का प्रयोग मिलता है। लेकिन इन देवताओं को यूं ही किसी शक्ति से जोड़कर उनकी उपासना करने नहीं बताया गया है, बल्कि वेदों में ऋषि उस व्यापक सत्य की खोज भी करते हैं जो पूरे अस्तित्व के पीछे है। वैदिक मंत्रों में देवताओं को ब्रह्मांडीय शक्तियों और प्रकृति के विभिन्न आयामों से भी जोड़ा गया है। अग्नि केवल अग्नि नहीं, बल्कि यज्ञ और देवताओं तक पहुंचने वाले माध्यम के रूप में भी वर्णित हैं। सूर्य प्रकाश और जीवन से जुड़े हैं। वरुण ऋत और नैतिक-ब्रह्मांडीय व्यवस्था से जुड़े दिखाई देते हैं। यहाँ 'ऋत' का सामान्य अर्थ ब्रह्मांडीय व्यवस्था, सत्य और वह नियम माना जाता है, जिसके अनुसार संसार चलता है।

# दिवंगत परिजन से लेकर भविष्य की झलक तक, जानिए ५ तरह के आध्यात्मिक सपनों का रहस्य

**कई बार सपने केवल अवचेतन मन में छिपे खयाल के रूप में उभरते हैं लेकिन कई बार ये सपने केवल कल्पना नहीं होते, बल्कि आत्मा और ब्रह्मांड के संदेश भी हो सकते हैं। अध्यात्म में ऐसे पांच सपनों के बारे में बताया गया है, जैसे कि भविष्यसूचक, प्रतीकात्मक, विजिटेशन और बार-बार आने वाले सपने। तो, चलिए समझते हैं इन सपनों का अर्थ...**

सपने सबको आते हैं लेकिन कुछ को आने वाले सपने बहुत ही अलग अनुभव दे जाते हैं। जैसे कि, कुछ सपने ऐसे होते हैं जो आंख खुलने के बाद भी लंबे समय तक मन में बने रहते हैं, जबकि किसी को कोई-कोई सपना बहुत वास्तविक महसूस होता है, किसी को कभी कोई दृश्य बार-बार दिखाई देता है, तो कभी-कभी किसी को दिवंगत प्रियजन से मुलाकात जैसा अनुभव होता है। चूंकि, ये सारे सपने अलग-अलग अनुभव देते हैं, तो इन सपनों के अर्थ भी अलग-अलग होते हैं। केवल इतना ही नहीं अध्यात्म में ऐसे सपनों को सामान्य सपनों से अलग माना गया है और इन सपनों को पांच खास श्रेणियों में बांटा गया है। तो, चलिए जानते हैं इन पांच प्रकार के सपने...१. भविष्यसूचक सपने

**२. प्रतीकात्मक सपने**

कई बार सपने में दिखाई देने वाली चीजों का अर्थ सीधे-सीधे नहीं लिया जाता। सपना किसी भावना या जीवन की परिस्थिति को प्रतीक के रूप में सामने ला सकता है। जैसे कि, अगर किसी व्यक्ति को बार-बार बंद दरवाजा दिखाई देता है, तो इसे किसी डर, निर्णय या ऐसी परिस्थिति के प्रतीक के रूप में देखा जा सकता है, जिसका सामना व्यक्ति वास्तविक जीवन में नहीं कर पा रहा। इसी तरह पानी, रास्ता, पहाड़, सांप, उड़ना, गिरना या अंधेरा जैसे प्रतीक अलग-अलग लोगों के लिए अलग अर्थ रख सकते हैं।

**३. दिवंगत प्रियजन से मुलाकात वाले सपने**

कभी-कभी किसी ऐसे व्यक्ति का सपना आता है, जिसका निधन हो चुका है। सपना इतना जीवंत हो सकता है कि जागने के बाद व्यक्ति को कुछ समय तक ऐसा महसूस होता है जैसे वह वास्तव में उस प्रियजन से मिला हो। इन सपनों में व्यक्ति दिवंगत परिजन से बातचीत करते, उन्हें गले लगाते या केवल उनकी उपस्थिति महसूस करते हुए देख सकता है। आध्यात्मिक मान्यताओं में ऐसे अनुभवों को कभी-कभी विजिटेशन ड्रीम्स कहा जाता है। कुछ लोग इन्हें दिवंगत आत्मा से मुलाकात या किसी संदेश का माध्यम मानते हैं।

**४. बार-बार आने वाले सपने**

कई बार आपको एक ही सपने बार-बार आते हैं। ऐसे सपने दोहराया जाने वाला सपना कहा जाता है। ऐसे सपनों में कोई दृश्य, व्यक्ति, स्थान या परिस्थिति बार-बार दिखाई दे सकती है। कभी सपना बिल्कुल वैसा ही दोहरता है तो कभी कहानी बदल जाती है, लेकिन उसका मूल भाव समान रहता है। आध्यात्मिक दृष्टिकोण में माना जाता है कि ऐसा सपना किसी ऐसे विषय की ओर ध्यान दिला सकता है जिसे व्यक्ति अभी तक समझ या स्वीकार नहीं कर पाया है। ऐसे में जब तक व्यक्ति उस सच्चाई को स्वीकार नहीं करता या सही कदम नहीं उठाता, सपने दोहराते रहते हैं।

**५. लूसिड और एस्ट्रल सपने**

लूसिड ड्रीम वह सपना है, जिसमें व्यक्ति को सपने के दौरान यह एहसास हो जाता है कि वह सपना देख रहा है। कुछ लोग इस अवस्था में सपने की घटनाओं को प्रभावित करने का अनुभव भी बताते हैं। वहीं एस्ट्रल ड्रीम्स को ऐसे अनुभवों से जोड़ा जाता है, जिनमें व्यक्ति को ऐसा महसूस हो कि वह अपने शरीर से अलग होकर किसी दूसरे स्थान या आयाम में पहुंच गया है। ऐसे सपनों में उड़ने, तैरने, किसी अनजान दुनिया में पहुंचने या असाधारण शांति का अनुभव होने जैसी बातें बताई जाती हैं। आध्यात्मिक परंपराओं में कुछ लोग इन्हें सूक्ष्म अनुभव या चेतना की अलग अवस्था मानते हैं।

# रोज एक ॲव्होकॅडो खाल्ल्यास तुमच्या शरीरावर काय परिणाम होतो?

ॲव्होकॅडो हे दिसायला अतिशय आकर्षक फळ आहे. लोक आता या फळाबद्दल अधिक जागरूक होत आहेत आणि आपल्या आहारात त्याचा समावेश करू लागले आहेत. जरी काहींना त्याची चव कदाचित आवडत नसेल, तरी त्यातील पोषक घटक शरीरासाठी अत्यंत फायदेशीर ठरतात. तज्ज्ञांच्या मते, ॲव्होकॅडोला सुपरफ्रूट म्हणणे अगदी योग्य आहे; कारण रोज एक ॲव्होकॅडो खाल्ल्याने आरोग्याला अनेक फायदे मिळतात. रोज एक ॲव्होकॅडो खाल्ल्यास तुमच्या शरीरावर काय परिणाम होतो? जाणून घेऊया.

**ॲव्होकॅडोमध्ये कोणती पोषक तत्वे असतात?**

सुपरफ्रूट असलेल्या ॲव्होकॅडोमध्ये जीवनसत्त्वे सी, ई, के आणि बी६ यांसारखी आवश्यक जीवनसत्त्वे, तसेच रायबोफ्लेविन, नियासिन, फोलेट, पॅन्टोथेनिक ॲसिड, मॅग्नेशियम आणि पोटॅशियम यांसारखी पोषक तत्वे असतात. याव्यतिरिक्त, यात ल्युटीन, बीटा-कॅरोटीन आणि ओमेगा-३ फॅटी ॲसिड्स देखील असतात. ॲव्होकॅडो हे 'हेल्दी फॅट्स' भरपूर असलेले फळ मानले जाते.



**१. हृदय निरोगी ठेवते**

एवोकॅडोमध्ये मोनोअनसॅच्युरेटेड फॅट्स म्हणजेच आरोग्यदायी फॅट्स असतात. आहारात याचा समावेश केल्याने हृदय निरोगी राहण्यास मोठी मदत होते. तसेच, यात असणारे पोटॅशियम आणि फायबर हृदयाचे कार्य सुरळीत ठेवतात.

**२. पचनसंस्थेसाठी फायदेशीर**

ॲव्होकॅडो केवळ हृदयासाठीच नाही तर पचनासाठीही उत्कृष्ट मानले जाते. हे फायबरचा एक चांगला स्रोत आहे. फायबर पचनसंस्था सुधारते आणि बद्धकोष्ठता, ॲसिडिटी व गॅस यांसारख्या समस्या कमी करते. तसेच, यामुळे पोट बराच वेळ भरलेले राहण्यास मदत होते.

**३. वजन नियंत्रित करण्यास मदत करते**

जर तुम्ही वजन कमी करण्याचा प्रयत्न करत असाल, तर तुम्ही आहारात ॲव्होकॅडोचा समावेश करू शकता. फायबर व्यतिरिक्त, ॲव्होकॅडोमध्ये अशी अनेक पोषक तत्वे असतात जी पोट भरलेले ठेवण्यास आणि वजन नियंत्रणात ठेवण्यास मदत करतात. याचे योग्य प्रमाणात सेवन करणे उत्तम असते.

**४. डोळ्यांच्या आरोग्यासाठी वरदान**

ॲव्होकॅडो खाणे डोळ्यांसाठी अत्यंत फायदेशीर ठरते. रोज एक ॲव्होकॅडो खाल्ल्याने दृष्टी चांगली राहण्यास मदत होते आणि डोळ्यांशी संबंधित इतर समस्यांचा धोका कमी होतो. ॲव्होकॅडोमध्ये ल्युटीन आणि झेक्सॅन्थिन सारखी कॅरोटीनॉइड्स असतात, जी डोळ्यांच्या आरोग्यासाठी फायदेशीर असतात.

**५. त्वचा आणि केसांसाठी फायदे**

ॲव्होकॅडो तुमचे केस आणि त्वचेसाठीही अत्यंत फायदेशीर आहेत. त्यातील ह्यव्हिटॅमिन ई आणि अँटीऑक्सिडंट्स त्वचा व केसांचे आरोग्य सुधारण्यास मदत करतात; विशेषतः व्हिटॅमिन ई हे दोन्हीसाठी अत्यंत गुणकारी मानले जाते.

**ॲव्होकॅडो कधी खावे?**

तज्ज्ञांच्या मते, तुम्ही नाश्ता किंवा दुपारच्या जेवणानंतर ॲव्होकॅडो खाऊ शकता. सकाळी टोस्टसोबत, सॅलडमध्ये किंवा स्मूदीमध्ये याचा आस्वाद घेता येतो. संध्याकाळी किंवा रात्रीही ते खाऊ शकता, परंतु लक्षात ठेवा की ॲव्होकॅडोमध्ये फायबरचे प्रमाण जास्त असते आणि त्यामुळे पोट भरल्यासारखे वाटू शकते. दिवसाला एक ॲव्होकॅडो खाणे साधारणपणे चांगले असते, परंतु त्यात कॅलरीजचे प्रमाण जास्त असल्याने तुमच्या दैनंदिन आहारात याचा समतोल राखणे गरजेचे आहे.

# केळीच्या पानावर जेवणे आरोग्यासाठी फायदेशीर



अजूनही अनेक घरी सण आणि शुभविधी प्रसंगी जेवणासाठी पत्रावळी किंवा केळीच्या पानांचा वापर होतो. दक्षिण भारतात तर अजूनही अनेक घरांत जेवणासाठी, उडपी हॉटेलमध्ये आणि मंदिरांमध्ये महाप्रसादासाठी केळीची पाने वापरली जातात. भारतात भोजनविषयक अनेक परंपरा आरोग्याशी जुळलेल्या आहेत. केळीच्या पानावर जेवणे ही हजारो वर्षे जुनी परंपरा आहे. खनिजाचा स्रोत केळाच्या पानात 'प्लॅन्ट बेस्ड कंपाउंड' जास्त असतात. पानातले 'पॉलिफेनॉल्स' किंवा 'एपिगॅलोकेटॅचिन गॅलेट' किंवा 'ईजीसीजी' म्हटले जाणारे घटक ग्रीन टीमध्ये आढळतात. यापासून नैसर्गिक ॲन्टीऑक्सिडन्ट मिळतात. त्यामुळे 'फ्री रॅडिकल्स' कमी होतात. आरोग्य चांगले राहते. मात्र, केळाच्या पानावर गरम अन्न वाढले तरच त्या अन्नात औषधी घटक शोषले जातात. ते अन्न पौष्ट्रि होते. केळीच्या पानावर जेवणे म्हणजे 'केमिकल फ्री' आहार घेण्यासारखे आहे. केळीच्या पानावर मेणासारखा अतिशय पातळ पापुद्रा असतो, त्यात औषधी गुण असतात. पानावर गरम अन्न वाढले की तो पापुद्रा उष्णतेने अन्नात मिसळतो आणि अन्न जास्त चविष्ट होते! बद्धकोष्ठता, अपचन, गॅससारखे त्रास होत नाहीत. केळीच्या पानांमधील ॲन्टीऑक्सिडन्ट पोटामध्ये जातात. केळीची पानं पर्यावरण पूरक असतात, त्यांचे लवकर विघटन होते. त्याचे खतही होते.

# 'अंजीर मिल्क'चे वरदान



सुक्या मेव्यामध्ये अंजीराला विशेष स्थान आहे. ताजे अंजीर वाळवल्यानंतर त्यातील पोषक घटक अधिक संकेंद्रित होतात. तंतुमय पदार्थ, कॅल्शियम, पोटॅशियम, मॅग्नेशियम तसेच शरीराचे मुक्त रॅडिकल्सपासून संरक्षण करणारे घटक अंजीरामध्ये आढळतात. त्यामुळे मर्यादित प्रमाणात अंजीराचा आहारात समावेश करणे फायदेशीर ठरू शकते. विशेषतः दूध आणि अंजीर एकत्र घेतल्यास प्रथिने, कॅल्शियम, तंतुमय पदार्थ आणि कर्बोदके अशा विविध पोषक घटकांचा एकाच वेळी शरीराला पुरवठा होतो.

२ ते ३ सुके अंजीर स्वच्छ धुवून एक कप दुधामध्ये काही मिनिटे मंद आचेवर उकळावेत. दूध कोमट झाल्यानंतर अंजीरासह त्याचे सेवन करता येते. दुसरा पर्याय म्हणजे अंजीर रात्रभर भिजत ठेवून सकाळी दुधासोबत खाणे. अंजीरामध्ये नैसर्गिक साखर असल्यामुळे या दुधात वेगळी साखर किंवा मध घालण्याची आवश्यकता नसते.

सुक्या अंजीरामध्ये आहारातील फायबर चांगल्या प्रमाणात असतात. हे तंतू मल मऊ होण्यास आणि नियमित शौचास मदत करतात. त्यामुळे बद्धकोष्ठतेचा त्रास असणार्यांना योग्य प्रमाणात अंजीर उपयोगी ठरू शकते. मात्र त्यासोबत दिवसभर पुरेसे पाणी पिणेही आवश्यक आहे. एकाच वेळी जास्त अंजीर खाल्ल्यास काही जणांना पोट फुगणे किंवा वायूचा त्रास होऊ शकतो.

दूध हे कॅल्शियम आणि प्रथिनांचा उत्तम स्रोत आहे, तर अंजीरामध्ये कॅल्शियमसह मॅग्नेशियम आणि पोटॅशियमसारखी खनिजे असतात. त्यामुळे अंजीर आणि दूध यांचा संतुलित आहारातील समावेश हाडे आणि दातांच्या आरोग्यासाठी पोषक ठरतो. अशक्तपणा जाणवणार्या किंवा वजन वाढविण्याचा प्रयत्न करणार्या व्यक्तींना संतुलित आहाराचा भाग म्हणून ते उपयोगी पडू शकते. सुक्या अंजीरामध्ये नैसर्गिक साखर आणि कर्बोदके केंद्रित स्वरूपात असतात. त्यामुळे मधुमेह असणार्यांनी अंजीर पूर्णपणे टाळण्याची आवश्यकता प्रत्येक वेळी नसली, तरी किती अंजीर खावे याकडे विशेष लक्ष द्यावे.

# कोहळ्याच्या बिया आरोग्यासाठी खूप फायदेशीर

कोहळ्याच्या बिया आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहेत. त्यात फॅटी ॲसिडस, फॉस्फरस, पोटॅशियम, जस्त, अत्यावश्यक अमिनो ॲसिड आणि फिनोलिक संयुगे असतात. या बिया खाल्ल्याने मधुमेह, हृदयरोग, स्नायू-हाडांचे दुखणे, केस गळणे थांबते; मुरुमही कमी होतात.

**बिया खाण्याचे फायदे –**

**कर्करोगविरोधी** – या बियांमध्ये अँटीऑक्सिडेंट, दाहक-विरोधी, अँटीमाइक्रोबायल, संधिवात-विरोधी आणि मधुमेह-विरोधी गुणधर्म असतात. यामुळे कर्करोग आणि 'यूटीआय'चा धोका कमी होतो.

**त्वचेसाठी** – या बियांचे तेलही निघते. ते त्वचेचे आरोग्य चांगले ठेवते. बियांमध्ये असलेले व्हिटॅमिन 'ए' आणि 'सी' कोलेजनचे उत्पादन वाढवतात. कोलेजन जखम भरण्यास मदत करते. त्वचा तजेली राहते. सुरकुत्या पडत नाहीत.

या बियांच्या तेलात 'ओमेगा-३' 'फॅटी ॲसिड' आणि 'कॅरोटीन' असते. हे पुरळ, फोड आणि त्वचेच्या तीव्र दाहांवर फायदेशीर आहे. या तेलामुळे



स्क्रब, लोशन किंवा मालिश करताना बॅक्टेरिया आणि बुरशीजन्य संसर्गापासून संरक्षण मिळते.

**हृदयरोग प्रतिबंधक** – कोहळ्याच्या बियांचा आहारात समावेश केल्यास कोलेस्ट्रॉल जमा होणे आणि रक्तवाहिन्या कडक होणे टळते. याशिवाय **हृदयासंबंधी विकार** – कोरोनरी आकुंचित होत नाहीत. स्ट्रोक होण्याचा धोका कमी होतो.

**केस वाढतात** – या बियांमध्ये 'ओमेगा -३'फॅटी ॲसिड भरपूर असते. यामुळे टक्कल पडत नाही; केस गळणे थांबते.

**मधुमेहावर नियंत्रण** – या बियांमध्ये मधुमेह विरोधी गुणधर्म असतात. मधुमेहावर नियंत्रण ठेवण्यासाठी फक्त बियाच नाही, भोपळ्याची पाने आणि कोहळे खाणे देखील फायद्याचे आहे.

**कोलेस्टेरॉल आणि लठ्ठपणा** – कोहळ्याच्या बिया निरोगी चरबी, फायबर आणि अँटिऑक्सिडंट्सचा समृद्ध स्रोत आहेत. या बियांनी वजन नियंत्रणात राहते. यकृतामध्ये कोलेस्टेरॉल जमा होत नाही. बियांमधील ओमेगा -३ फॅटी ॲसिड, फायटोस्टेरॉल, व्हिटॅमिन-ई डेरिव्हेटिव्ह्ज आणि कॅरोटीन लठ्ठपणा वाढू देत नाही.

# ठाणे व पालघर अन्न व औषध प्रशासनाची प्रतिबंधित पान मसाला व सुगंधित तंबाखूविरुद्ध धडक कारवाई,प्रतिबंधित अन्न पदार्थ व वाहने जप्त

**ठाणे :** महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेल्या पान मसाला, सुगंधित तंबाखू व तत्सम पदार्थांची अवैध वाहतूक आणि साठवणुकीविरोधात अन्न व औषध प्रशासनाने ठाणे-पालघरमध्ये धडक मोहीम राबवली. ठाणे झोन-१०, पालघर झोन-१ आणि ठाणे झोन-७ अंतर्गत केलेल्या तीन स्वतंत्र कारवायांमध्ये प्रतिबंधित अन्नपदार्थ आणि तीन वाहने असा तब्बल २ कोटी ६९ लाख २९ हजार ८६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणांत पोलिस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले असून, प्रतिबंधित पदार्थांच्या मागे संघटित रॅकेट आहे का, याचाही तपास करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

येवई ब्रिजजवळ १ कोटीचा मुद्देमाल

ठाणे झोन-१०च्या पथकाला प्रतिबंधित पदार्थांची वाहतूक करणारा ट्रक येवई ब्रिज परिसरातून जाणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी गुन्हे शाखेच्या पोलिसांच्या मदतीने ट्रक अडवून तपासणी केली.



याप्रकरणी भिवंडी तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**चारोटीमध्ये ६३.५० लाखांचा माल जप्त**

पालघर झोन-१ अंतर्गत चारोटी टोलनाका परिसरातही मोठी कारवाई करण्यात आली. प्रतिबंधित पदार्थांची वाहतूक करून विक्रीच्या उद्देशाने साठवणूक केल्याचे निदर्शनास आल्यानंतर पथकाने कारवाई केली. या कारवाईत ४३ लाख ५० हजार रुपयांचा प्रतिबंधित माल आणि सुमारे २० लाख रुपये किमतीचा जप्त करण्यात आला.

या प्रकरणात वाहनचालक फिरोज खाजा मिया सय्यद याच्यासह आणखी सहा आरोपींचा सहभाग आढळून आला आहे. कासा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणातील पदार्थांची वाहतूक, साठवणूक व विक्री यामागे संघटित स्वरूप आहे का, याचा तपास करण्याचे पोलिसांना निर्देश देण्यात आले आहेत. तसेच या प्रकरणात टडडउअ लागू होतो किंवा नाही, याबाबत तपास करून पुढील कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**डोंबिवली प्रकरणात १.१४ कोटींची जप्ती**

ठाणे झोन-७च्या कारवाईतही प्रतिबंधित पदार्थांचा मोठा साठा जप्त करण्यात आला. या प्रकरणात सोनारपाडा, डोंबिवली पूर्व येथील विनय शर्मा याच्याविरुद्ध खडकपाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. आरोपीकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे मोहम्मद रफिक रती खान (३१) याला अटक करण्यात आली.

या कारवाईत ८४ लाख २८ हजार २० रुपयांचा प्रतिबंधित माल आणि सुमारे २० लाख रुपये किमतीचे वाहन जप्त करण्यात आले. त्यामुळे या टप्प्यातील जप्ती १ कोटी ४ लाख २८ हजार २० रुपये आहे. यापूर्वीच्या कारवाईसह या प्रकरणातील एकूण जप्ती १ कोटी १४ लाख १३ हजार ५८० रुपये असल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे.

या प्रकरणातही प्रतिबंधित पदार्थांची वाहतूक, साठवणूक आणि विक्री यामागील संघटित स्वरूपाचा तपास करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. MCOCA लागू होतो किंवा नाही, याबाबतही तपास सुरू आहे.

## आरोग्य सेवांची 'नाडी' जाणण्यासाठी १ नोव्हेंबरपासून 'आरोग्य संवाद यात्रा'



**मुंबई:** राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम, गुणवत्तापूर्ण आणि लोकाभिमुख करण्यासाठी सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या पुढाकारातून १ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर २०२६ या कालावधीत राज्यव्यापी 'आरोग्य संवाद यात्रा' आयोजित करण्यात येणार आहे. या माध्यमातून आरोग्यमंत्री थेट जनतेशी संवाद साधणार असून, राज्यातील आरोग्य सेवांचा आढावा घेऊन त्यातील त्रुटी दूर करण्यावर भर दिला जाणार आहे. आरोग्य योजनांचा प्रत्यक्ष लाभ नागरिकांपर्यंत किती प्रमाणात पोहोचतो, आरोग्य संस्थांमध्ये कोणत्या सुविधा उपलब्ध आहेत आणि रुग्णसेवेत कोणत्या अडचणी येतात, याचा यात्रेत आढावा घेतला जाणार आहे. प्रत्येक जिल्ह्यातील पाच प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि दोन ग्रामीण रुग्णालयांच्या कामकाजाची वस्तुस्थिती जाणून घेतली जाणार आहे. आरोग्य उपकेंद्रांपासून जिल्हा, महानगरपालिका, मनोरुग्ण आणि विशेष रुग्णालयांपर्यंतच्या सेवांचाही आढावा घेतला जाणार आहे. लोकसहभाग वाढविण्यासाठी जिल्हा, तालुका, महापालिका आणि ग्रामपातळीवरील आरोग्य समित्यांच्या बैठका स्थानिक लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत होणार आहेत. या बैठकांमध्ये आवश्यक सुविधा, मनुष्यबळ, औषधांचा पुरवठा, रुग्णसेवेतील अडचणी आणि योजनांच्या अंमलबजावणीतील त्रुटींबाबत सूचना मागविण्यात येणार आहेत.

## 'शिवशाही' कल्याण, अंबरनाथला २० हजार घरे उभारणार; पंतप्रधान आवास योजनेतील घरांसाठी राज्य सरकारकडून ४६ हेक्टर जमीन घेणार

**मुंबई :** मुंबई महानगर प्रदेशात सर्वसामान्यांचे हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी शिवशाही पुनर्वसन प्रकल्प कल्याण आणि अंबरनाथ तालुक्यात प्रधानमंत्री आवास योजना २.० अंतर्गत (पीएमएवाय) तब्बल २० हजार घरे उभारणार आहे. त्यासाठी राज्य सरकारकडून नाममात्र किंमतीला कल्याणमध्ये सुमारे ४६ हेक्टर जमीन घेतली जाणार आहे.



राज्य शासनाच्या शिवशाही पुनर्वसन प्रकल्प या पंपनीमार्फत पीएमएवाय अंतर्गत सदरची घरे उभारली जाणार आहेत. कल्याण येथे १५ हजार घरांसाठी सुमारे ३४ हेक्टर तर अंबरनाथ येथे ५ हजार घरांसाठी १२ हेक्टर जागेची आवश्यकता आहे. सदरची जमीन राज्य सरकार जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून उपलब्ध करून देणार असून त्याची प्रतिएकर केवळ १ रुपये एवढी नाममात्र किंमत आकारली जाणार आहे. त्यानुसार जमीन अधिग्रहणाचा प्रस्ताव संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना दिला जाणार आहे. घरांच्या उभारणीबाबतचा सविस्तर प्रकल्प आराखडा शिवशाहीने तयार केला असल्याची माहिती एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. त्यामुळे घराच्या प्रतीक्षेत असलेल्या सर्वसामान्यांना घर मिळू शकणार आहे.

क्लस्टरलाही वेग

याशिवाय शिवशाहीमार्फत कल्याण:डोंबिवलीतील ७५० हेक्टर आणि उल्हासनगरमधील ३२५ हेक्टर जागेवर समूह पुनर्विकास प्रकल्प राबविण्यात येणार आहे. यात कल्याण:डोंबिवलीतील ६ आणि उल्हासनगर महापालिका क्षेत्रातील २९ प्रकल्प पूर्ण करण्यात येणार आहेत. याबाबत शिवशाहीने संबंधित महापालिका आयुक्तांसोबत सामंजस्य करार केला असून हा प्रस्ताव मंजुरीसाठी राज्य शासनाकडे पाठविला आहे.

## दादर : नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ एसटी बससेवेचा मंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते शुभारंभ

**मुंबई :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची मुंबईशी सार्वजनिक वाहतूक कनेक्टिव्हिटी अधिक सक्षम करण्यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) वतीने सुरू करण्यात आलेल्या दादरह्नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ बससेवेचा परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या शुभहस्ते प्रारंभ झाला. अटलसेतू मार्गे धावणाऱ्या या बससेवेमुळे दादरहून विमानतळापर्यंत प्रवाशांना थेट, सुरक्षित आणि आरामदायी प्रवासाची सुविधा उपलब्ध झाली आहे.

यावेळी मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, 'नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला एसटीच्या व्यापक सार्वजनिक वाहतूक जाळ्याशी जोडण्याच्या दृष्टीने ही बससेवा महत्वाची आहे. मुंबईतील प्रमुख वाहतूक केंद्र असलेल्या दादरहून थेट विमानतळापर्यंत सेवा सुरू झाल्याने विमानप्रवाशांसह सर्वसामान्य नागरिकांना मोठा फायदा होईल.' विमानतळाची कनेक्टिव्हिटी वाढविण्यासाठी एसटीकडून बोरिवलीह्नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि स्वारगेट:नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ या बससेवाही सुरू करण्यात आल्या आहेत. मुंबई, नवी मुंबई आणि पुणे या प्रमुख शहरांना विमानतळाशी जोडण्याच्या दृष्टीने या सेवांचा महत्वपूर्ण उपयोग होणार आहे.

## 'चला शाळेत जाऊया' अभियानाला राज्यभर उत्स्फूर्त प्रतिसाद

**मुंबई :** राज्यातील शाळांमधील शैक्षणिक गुणवत्ता, पायाभूत सुविधा, विद्यार्थ्यांची उपस्थिती, अध्यापन-अध्ययन प्रक्रिया तसेच विविध शासकीय शैक्षणिक योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीचा प्रत्यक्ष आढावा



घेण्यासाठी शालेय शिक्षण विभागाच्या वतीने 'चला शाळेत जाऊया' अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाला राज्यभर उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, मंत्री, वरिष्ठ अधिकारी, पालक अधिकारी आणि जिल्हा नोडल अधिकारी यांच्या प्रत्यक्ष शाळा भेटींमुळे शालेय प्रशासनातील सकारात्मक बाबी, अडचणी आणि आवश्यक सुधारणांच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण माहिती उपलब्ध होत आहे.

शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांची कोकणातील शाळांना भेट

मंत्री भुसे यांनी अभियानाच्या तिसऱ्या टप्प्यात ७ ते ९ ऑक्टोबर दरम्यान कोकण विभागातील विविध शाळांना प्रत्यक्ष भेट देऊन शैक्षणिक गुणवत्ता व पायाभूत सुविधांचा आढावा घेतला. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पांडुरंगशेठ पडते, पडतेवाडी तसेच जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळा, खारेपाटण क्रमांक १, रत्नागिरी जिल्ह्यातील जिल्हा परिषद पूर्व प्राथमिक शाळा, पानवल, होरंबेवाडी आणि जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक केंद्र शाळा झरेवाडी, रायगड जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळा आदिवासीवाडी तसेच जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, झिरड येथे भेट देऊन शाळांमधील शैक्षणिक व भौतिक सुविधांची पाहणी केली. या भेटींदरम्यान विद्यार्थ्यांच्या वाचन, लेखन व अध्ययन कौशल्यांचा आढावा घेण्यात आला. गुणवंत विद्यार्थ्यांचा तसेच 'आयडॉल शिक्षक' म्हणून निवड झालेल्या शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. शालेय शिक्षण विभागाचे 'राष्ट्र प्रथम' हे ब्रीदवाक्य केंद्रस्थानी ठेवून पायाभूत सुविधांसोबतच गुणवत्तापूर्ण, आनंददायी आणि संस्कारक्षम शिक्षणाला प्राधान्य देण्याचे निर्देश मंत्री भुसे यांनी दिले.

# माटुंगा शिधा वाटप कार्यालय आणि धारावी शिधावाटप कार्यालय यांच्या हद्दीतील रेशनिंग दुकानदारांचा दुकानदाराचा काळाबाजार

**मुंबई (प्रतिनिधी) :** दिवसा दिवस राज्यामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये भेसळीवर कारवाई होत आहे तर याच्यामध्ये रेशनिंग विभाग यांच्यावर कारवाई का नाही असा सवाल नागरिक करत आहेत माटुंगा माटुंगा शिधा वाटप यांच्या कार्यालयाच्या हद्दीत येणाऱ्या सायन कोळीवाडा कोकरी आगार संगमनगर वडाळा सायन बरकतली नाका प्रतीक्षा नगर कोरबा मिठा नगर शेख मिस्त्री दर्गा आदी परिसरात मोठ्या प्रमाणात रेशनिंग चे दुकाने आहेत सणासुदीच्या या दिवसांमध्ये रेशनिंग दुकानदाराने शिधावाटप कार्ड धारकांना देण्यात येणारा मोठ्या प्रमाणात विकण्याचा सिलसिला सुरू केला आहे अनेक ठिकाणी गहू विकले जाते अनेक ठिकाणी तांदूळ विकले जाते तर अनेक ठिकाणी सणासुदीच्या दिवसात आलेले सरकारचे गिफ्ट विकण्यात येते असे मोठ्या प्रमाणात होत असताना रेशनिंगचे अधिकारी मात्र या सर्वांना पाठिंबा देत असल्याची चर्चा सुरू आहे प्रत्येकाला रेशनिंग कार्ड वर मिळणाऱ्या गहू मधून तांदळातून गरिबांचा हिस्सा चोरणाऱ्या जेवढा नियमाप्रमाणे देणे असताना सुद्धा रेशनिंग कार्ड मध्ये दाखल केलेले



असताना त्यांना पूर्ण रचना दिले जात नाहीत त्यांचे राशन विकत घेण्यात येते त्यांचे अर्ध्या भावात सदर अन्नधान्य विकण्यात येते हा बोल बाला फक्त माटुंगा विधानसभा क्षेत्रात नाही तर संपूर्ण माटुंगा अन्नधान्य वाटप कार्यालयाच्या हद्दीत येणाऱ्या सर्व दुकानावर सुरू आहे असे अनेक दुकानदार रेशनिंग कार्डधारकांना देण्यात येणारा अन्नधान्य अन्यत्र विकून विकून नफा मिळवत आहेत अशा दुकानांवर कायमस्वरूपी टाळा लावण्याची मागणी करण्यात येत आहे. असे अनेक दुकाने आहेत ज्यांच्यामध्ये अधिकारी यांची दिशाभूल करून परस्पर माल विकण्याचा सिलसिला सुरू आहे कोटा संपला की अन्नधान्य मागवा असा खेळ खंडोबा सुरू आहे सरकारचा फायदा गरिबांना होत नसून सर्वात जास्त फायदा या दुकान मालकांना होत आहे अशा या सर्व दुकानांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे या दुकानदारांना मदत करणाऱ्या अधिकाऱ्यांवर ही कारवाई करण्याची मागणी विभागातील नागरिक करत आहे

# राज्यात १० नवीन नर्सिंग महाविद्यालयांना मान्यता

**मुंबई :** राज्यातील नागरिकांना दर्जेदार आणि सक्षम आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशिक्षित परिचारिकांची संख्या वाढविण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार वैद्यकिय शिक्षण विभागाने नर्सिंग शिक्षणाच्या सुविधा आणि प्रवेश क्षमता वाढविण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.या निर्णयानुसार ८ शासकीय जी. एन. एम. पदविका नर्सिंग महाविद्यालयांचे श्रेणीवर्धन करून बी.एस्सी. नर्सिंग महाविद्यालये सुरू करण्यास, पाच कार्यरत बी.एस्सी. नर्सिंग महाविद्यालयांची प्रवेश क्षमता ५० वरून १०० करण्यास तसेच १० नवीन शासकीय बी.एस्सी. नर्सिंग महाविद्यालये सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. आरोग्यसेवा सक्षम करण्यासाठी रुग्णालये, औषधे आणि अत्याधुनिक उपकरणांसोबतच प्रशिक्षित परिचारिकांची उपलब्धता महत्त्वाची आहे. राज्यात सध्या २,१७,६४० परिचारिका नोंदणीकृत असून, शासकीय तसेच खासगी आरोग्य संस्थांमध्ये प्रशिक्षित परिचारिकांची वाढती गरज लक्षात घेऊन नर्सिंग शिक्षणाचा विस्तार करण्याचे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी वैद्यकीय शिक्षण विभागाला दिले होते.मुंबईतील जी.टी. व सेंट जॉर्जेस रुग्णालय, तसेच धुळे, सोलापूर, अंबाजोगाई, अकोला, नागपूर आणि सांगली येथील जी.एन.एम. पदविका नर्सिंग महाविद्यालयांचे श्रेणीवर्धन करून




प्रत्येकी १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेची बी. एस्सी. नर्सिंग महाविद्यालये सुरू करण्यात येणार आहेत. या आठ महाविद्यालयांसाठी केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत प्रत्येकी सात कोटी रुपये निधी उपलब्ध होणार आहे.

मुंबई, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, पुणे आणि नांदेड येथील कार्यरत बी.एस्सी. नर्सिंग महाविद्यालयांची प्रवेश क्षमता ५० वरून १०० करण्यात येणार आहे. तसेच चंद्रपूर, सिंधुदुर्ग, यवतमाळ, अलिबाग (रायगड), रत्नागिरी, अमरावती, धाराशिव आणि गडचिरोली येथे प्रत्येकी १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेची नवीन शासकीय बी.एस्सी. नर्सिंग महाविद्यालये सुरू करण्यात येणार आहेत.

तिन्ही बाबींसाठी एकूण ५५८.७१ कोटी रुपयांच्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी केंद्र शासनाचा निधी वगळता ४९१.९१ कोटी रुपये राज्याच्या अर्थसंकल्पातून उपलब्ध करून देण्यात येणार असून, हा खर्च चार वर्षांच्या कालावधीत टप्प्याटप्प्याने करण्यात येणार आहे.

जी.एन.एम. ते बी.एस्सी. नर्सिंग श्रेणीवर्धन, कार्यरत महाविद्यालयांची प्रवेश क्षमता वाढविणे आणि नवीन महाविद्यालये सुरू करण्यासाठी एका वर्षाकरिता सुमारे १२.५८ कोटी रुपयांच्या खर्चासही मान्यता देण्यात आली आहे.

# मुंबईत ड्रोन, पॅराग्लायडरच्या उड्डाणावर ३० दिवस बंदी

**मुंबई :** दहशतवादी अथवा राष्ट्रविरोधी घटकांकडून ड्रोन, रिमोट कंट्रोल्ड मायक्रो-लाइट एअरक्राफ्ट, पॅराग्लायडर आदींचा वापर करून हल्ला करण्याची शक्यता लक्षात घेऊन मुंबई पोलिसांनी महत्त्वाचा प्रतिबंधात्मक आदेश जारी केला आहे.भारतीय नागरिक



सुरक्षा संहिता (बीएनएसएस) २०२३ मधील कलम १६३ अंतर्गत मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत विविध प्रकारच्या मानवरहित किंवा हलक्या हवाई उपकरणांच्या उड्डाणावर ३० दिवसांसाठी बंदी घालण्यात आली आहे.पोलीस उपआयुक्त (अभियान) तथा कार्यकारी दंडाधिकारी अकबर पठाण यांनी हा आदेश ६ ऑक्टोबर रोजी जारी केला. त्यानुसार १४ ऑक्टोबर २०२६ रोजी मध्यरात्री १२.०१ वाजल्यापासून १२ नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत हा आदेश लागू राहणार आहे. या कालावधीत ड्रोन, रिमोट कंट्रोल्ड मायक्रो-लाइट एअरक्राफ्ट, पॅराग्लायडर, पॅरा-मोटर्स, हॅण्ड ग्लायडर्स आणि हॉट एअर बलून यांच्या उड्डाणास मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात मनाई करण्यात आली आहे. या माध्यमातून व्हीव्हीआयपींना लक्ष्य करणे, मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक जीवन धोक्यात आणणे, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणे किंवा कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करण्याची शक्यता असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत देण्यासाठी शासन प्रयत्नशील : महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**मुंबई :** दुष्काळग्रस्त भागांतील पंचनामे सुरू असून अहवाल प्राप्त होताच मदतीचे निकष, पीक विमा योजना तसेच राज्य शासनाची मदत यांचा समन्वय साधून दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत देण्यासाठी शासन प्रयत्न करेल, असे दुष्काळासंदर्भातील मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष तथा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले. केंद्रीय दुष्काळ पाहणी पथक राज्यात येत असून त्यांच्या भेटीची ठिकाणे निश्चित करण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत राज्यातील दुष्काळी उपाययोजना, उपलब्ध पाणीसाठा आणि पीक-पाण्याच्या परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. त्यानंतर झालेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत शेतकरी व शेतमजुरांना केंद्रस्थानी ठेवून विविध उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. यावेळी समिती सदस्य मंत्री पंकजा मुंडे, दत्तात्रय भरणे, मकरंद पाटील, नितेश राणे, गुलाबराव पाटील, संजय राठोड, जयकुमार गोरे, प्रताप सरनाईक, गिरीष महाजन, बाबासाहेब पाटील, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह संबंधित विभागांचे प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले, राष्ट्रीयकृत आणि खासगी बँका तसेच खासगी वित्त संस्थांनी या काळात कर्जवसुलीसाठी शेतकऱ्यांना दूरध्वनी करू नयेत. शेतकऱ्यांना वेठीस धरणाऱ्या बँकांवर कडक कारवाई करण्याचे निर्देश देण्यात येतील. मुख्य सचिवांनी रिझर्व बँकेच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून त्या माध्यमातून बँकांसाठी सूचना द्याव्यात. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली बँकांच्या जिल्हास्तरीय बैठका घ्याव्यात.

# प्रकल्पबाधित पुनर्वसन सदनिकांच्या वाटपातील कथित गैरप्रकाराची पोलिसांकडून चौकशी;

## MMRDA प्रशासनाने एजंट-दलालांच्या अनधिकृत हस्तक्षेपावर घातली बंदी

**मुंबई :** प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसन सदनिकांच्या वाटपातील कथित गैरप्रकार, बनावट कागदपत्रे आणि एजंट-दलालांच्या हस्तक्षेपाबाबतच्या तक्रारीची दखल घेत MMRDA प्रशासनाने कार्यालयीन कामकाजात बाहेरील मध्यस्थांच्या अनधिकृत हस्तक्षेपास प्रतिबंध घातला आहे. तसेच संबंधित फसवणुकीच्या आरोपांप्रकरणी पोलिस तपास सुरू असल्याचे प्रशासनाने लेखी पत्राद्वारे स्पष्ट केले आहे.

स्वाभिमानी भारतीय पँथरचे संस्थापक-अध्यक्ष श्री. अंकुशदादा वसंत कुराडे यांनी शासनाच्या तक्रार पोर्टलसह MMRDA कडे याबाबत तक्रार केली होती. त्यावर अपर जिल्हाधिकारी तथा प्रमुख, सामाजिक विकास कक्ष, MMRDA यांनी ५ ऑक्टोबर २०२६


एम एम आर डी ए
MMRDA

क्र.प्र/आस्था-१०/सा.वि.क./ईमेल-आपले सरकार/१२८९/२०२६ दिनांक : 05/10/2026

प्रति,
श्री. अंकुशदादा वसंत कुराडे,
संस्थापक/अध्यक्ष, स्वाभिमानी भारतीय पँथर,
कांजूरचा विघ्नहर्ता गणेश मंदिर, बिं.के/६ समोर,
एम.एस.आर.डी.ए.वसाहत, कांजूरमार्ग (प.),
मुंबई - ४०० ०७८.
भ्रमणध्वनी क्र. ७७३८८८६५५५.
ईमेल- swabhimanipanther@gmai.com

विषय:- प्रकल्पबाधित पुनर्वसन सदनिकांच्या वाटपामध्ये बनावट कागदपत्रे, सदनिकांचा कथित गैरवापर व एजंट/दलालांच्या हस्तक्षेपाबाबत गंभीर पोलीस तपास सुरु असताना,प्रशासनाने दिनांक ०९.०९.२०२६ रोजी काढलेल्या कार्यालयीन आदेशाबाबत.

संदर्भ:- १) आपला दिनांक १६.०९.२०२६ रोजी प्राप्त झालेला तक्रारीचा ई-मेल.
२) आपले सरकार पोर्टलवरील तक्रार क्र. DEP/URDD/MUMS/२०२६/१३७, दिनांक २१.०९.२०२६.

१) आपण मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक ०९.०९.२०२६ रोजीच्या कार्यालयीन आदेशानुसार सामाजिक विकास कक्ष तसेच भूसंपादन व पुनर्वसन शाखेच्या कार्यालयीन कामकाजामध्ये बाहेरील मध्यस्थ / दलाल / एजंट यांचे अनधिकृत हस्तक्षेपास प्रतिबंध घालण्यात आलेला आहे.
२) फसवणूकीबाबत खंडणी विरोधी पथकामार्फत / गुन्हेशाखेमार्फत तपास चालू असून पोलिस विभागामार्फत तपास चालू आहे. संबंधितांकडून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. तरी, याबाबत अंतिम कार्यवाही झाल्यानंतर आपणास कळविण्यात येईल.

सबब, आपला तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

05/10/2026
अपर जिल्हाधिकारी तथा
प्रमुख, सामाजिक विकास कक्ष

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

रोजी पत्राद्वारे प्रशासनाची भूमिका स्पष्ट केली.

पुनर्वसन सदनिकांच्या वाटपात पात्र लाभार्थ्यांना न्याय मिळावा, कागदपत्रांची सत्यता तपासावी आणि



दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी कुराडे यांनी केली आहे.

'चौकशी निष्पक्ष व पारदर्शक झाली पाहिजे,' असे सांगताना कुराडे यांनी प्रकल्पबाधितांच्या हक्कांचे संरक्षण करून पात्र लाभार्थ्यांना न्याय देण्याची मागणी केली.

या प्रकरणातील पोलिस तपासाच्या पुढील कार्यवाहीकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते १०३ पोलीस अधिकारी व जवानांना पदके प्रदान

**मुंबईतील लोक भवन येथे महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत १०३ पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना विविध प्रतिष्ठित पोलीस पदकांनी सन्मानित करण्यात आले.**



**मुंबई :** महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबईतील लोक भवन येथे एका दिमाखदार सोहळ्यात १०३ पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना शौर्य, विशिष्ट सेवा आणि गुणवत्तापूर्ण सेवेसाठी प्रतिष्ठित पोलीस पदके प्रदान करण्यात आली. भारताच्या राष्ट्रपतींकडून २०२२ ते २०२४ या कालावधीतील स्वातंत्र्य व प्रजासत्ताक दिनानिमित्त जाहीर झालेली ही पदके शुक्रवारी सन्मानपूर्वक वितरीत करण्यात आली.या विशेष समारंभात राष्ट्रपती शौर्य पदके (२), शौर्य पदके (१८), राष्ट्रपतींचे विशिष्ट सेवेसाठीचे पोलीस पदक (३), उत्कृष्ट सेवेसाठीचे पोलीस पदक (४), पोलीस पदके (४०) आणि गुणवत्तापूर्ण सेवा पदके (३६) अशा एकूण १०३ पदकांचा गौरव करण्यात आला.

**प्रमुख सन्मानित अधिकारी**

या सोहळ्यात उत्कृष्ट आणि कर्तव्यकठोर सेवेबद्दल राज्यातील अनेक वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला, ज्यामध्ये प्रामुख्याने खालील अधिकाऱ्यांचा समावेश होता:

▪ निकेत कौशिक (पोलीस आयुक्त, मीरा-भयंदर, वसई-विरार) ▪ विनय कुमार चौबे (पोलीस आयुक्त, पिंपरी-चिंचवड) ▪ प्रवीण साळुंखे (अतिरिक्त पोलीस महासंचालक, वाहतूक)▪ मधुकर पांडे (अतिरिक्त पोलीस महासंचालक, प्रशासन) ▪ प्रवीण कुमार पाडवळ (पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा)▪ निशीथ मिश्रा (पोलीस महानिरीक्षक, प्रशिक्षण आणि विशेष पथके)

**मान्यवरांच्या उपस्थितीत सोहळा संपन्न**

या कार्यक्रमाला गृह (ग्रामीण) राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, अतिरिक्त मुख्य सचिव (गृह) मनीषा म्हैस्कर, पोलीस महासंचालक सदानंद दाते, अतिरिक्त पोलीस महासंचालक (एटीएस) नवल बजाज यांच्यासह अनेक वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि सन्मानित जवानांचे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रगीत आणि राज्यगीताच्या सुमधूर स्वरांमध्ये या शानदार सोहळ्याची सुरुवात आणि सात्तांग पार पडली.

# सर्व जातींसाठी एकत्रित हॉस्टेल उभारणार-महसूल मंत्री बावनकुळे



**मुंबई :** जातीपातीच्या भिंती दूर करून सर्व समाजातील विद्यार्थ्यांना एकाच ठिकाणी चांगल्या सुविधा मिळाव्यात, यासाठी राज्यभरात एकत्रित विद्यार्थी वसतिगृहे उभारण्यात येणार असून त्यासाठी योग्य जागा निश्चित करून १३ ऑक्टोबरपर्यंत प्रस्ताव शासनाकडे पाठवावेत, असे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी गुरुवारी मंत्रालयात झालेल्या बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांना दिले.

विभागीय स्तरावर एक हजार, तर जिल्हा स्तरावर ५०० विद्यार्थ्यांच्या क्षमतेची वसतिगृहे उभारण्यात येणार आहेत. इतर मागासवर्ग बहुजन कल्याण विभागाच्या वसतिगृहांसाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत झालेल्या या बैठकीत आदिवासी, अनुसूचित जाती-जमाती, इतर मागासवर्गीय, मराठा तसेच सर्व समाजातील विद्यार्थ्यांना स्वतंत्र वसतिगृहांऐवजी भविष्यात एकाच ठिकाणी निवासाची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या संकल्पनेवर चर्चा झाली. त्यासाठी योग्य आणि सोयीस्कर शासकीय जागा निश्चित करून प्रस्ताव पाठविण्याच्या सूचना देण्यात आल्या. वसतिगृहासाठी जागा निवडताना केवळ उपलब्ध शासकीय जागेचा विचार न करता विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून जागेची निवड करावी, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी ये-जा करणे सोपे व्हावे, सार्वजनिक वाहतूक उपलब्ध असावी तसेच आरोग्य सुविधा, बाजारपेठ आणि इतर दैनंदिन गरजा सहज उपलब्ध होतील, अशा ठिकाणी जागा असावी. भविष्यातील विस्ताराची शक्यताही लक्षात घ्यावी, असे त्यांनी सांगितले. राज्यात यापूर्वी विविध समाजघटकांसाठी स्वतंत्र वसतिगृहांची व्यवस्था करण्यात आली आहे.



# सायन पुलाच्या उद्घाटनाला सापडला मुहूर्त पूल १५ ऑक्टोबरला होणार वाहतुकीसाठी खुला

**मुंबई :** मुंबई शहराला उपनगराला जोडणारा आणि वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाचा असणाऱ्या सायन रेल्वे पुलाच्या उद्घाटनाला अखेर मुहूर्त सापडला असून १५ ऑक्टोबर रोजी पूल वाहतुकीस खुला होईल, असे पालिकेच्या पूल विभागाच्या वतीने सांगण्यात आले.

सायन रेल्वे स्थानकावरील रेल्वे पुलाच्या पुनर्बांधणीचे काम रेल्वेने पालिकेकडे सोपवले आहे. हा पूल रेल्वेच्या पाचव्या आणि सहाव्या मार्गिकेमधून जात असल्याने त्याच्या पुनर्बांधणीचा प्रस्ताव रेल्वेने दिला होता. या कामासाठी येणारा पुनर्बांधणीचा खर्च मध्य रेल्वेमार्फत दिला जाणार आहे. मात्र, पुलाच्या पोहोच रस्त्याचे काम मुंबई महापालिकेने करावे, असे मध्य रेल्वेने स्पष्ट केले होते.

**बांधकाम पद्धतीत बदल**

पुलाच्या पोहोच रस्त्याचे काम करताना काही अडथळे निर्माण झाल्यामुळे मूळ बांधकाम पद्धतीत बदल करण्यात आला आहे. या बदलामुळे प्रकल्प खर्चात वाढ झाली असून, त्याबाबत मध्य रेल्वेची मंजुरी देखील घेण्यात आली आहे. या बदलांमुळे आता सायन रेल्वे स्थानकावरील पुलाच्या कामाला गती मिळण्याची चिन्हे दिसत आहेत. या पुलाच्या पोहोच रस्त्याच्या बांधकामामुळे खर्च ७ कोटीने वाढला असून तो ४९ कोटी ९६ लाख ४३३ रुपयांवर गेला आहे.







हे मासिक पत्र मुद्रक, प्रकाशक चंद्रशेखर लिंगय्य स्वामी द्वारा विश्वात्मक सामाजिक सेवा ट्रस्ट के लिए सोमानी प्रिंटिंग प्रेस, युनिट नं.४, ग्राउंड फ्लोर, एन.के. इंडस्ट्रीयल इस्टेट, आरे रोड, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेट के पास,गेट नं.२, गोरेगांव (पूर्व),मुंबई-४०००६३ से मुद्रित कराकर एवं रुम नं.३, महात्मा गांधी चाल,९० फिट रोड, धारावी पोलीस स्टेशन के सामने, धारावी, मुंबई- ४०००१७ से प्रकाशित किया. संपादक : चंद्रशेखर लिंगय्या स्वामी (+91 9870687192),व्हॉट्सॲप नंबर- +91 7303557477 (RNI No.:MAHBIL/2019/79644)

मुख्य कार्यालय : दुकान क्र. ५३, ४ था मजला, बीएमसी इमारत, ब्युमॉन्ट शेजारी, क्रोमा समोर, सायन पूर्व, सायन कोळीवाडा रोड, मुंबई, महाराष्ट्र - ४०००२२

नवी मुंबई संपर्क कार्यालयः डॉ. रीना अग्रवाल मानद संपादक - शॉप क्र.१, ट्रायटन मेडोज, सेक्टर-८, प्लॉट क्र.१४, सीसर्स आणि नॉइज सलून जवळ, सानपाडा,नवी मुंबई.

उप संपादक : गीताताई स्वामी ○ Email- vishwatmaklokswamivarta@gmail.com ○ (प्रकाशित बातम्या/लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद मुंबई न्यायकक्षेत)